छात्र

# प्रबोधन

वर्ष ४ अंक ९

सौर चैत्र शके १९१८



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक !

# एप्रिल - मे - जून मधील विविध शिबिरे

## नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे

**मुलींसाठी :** २६ एप्रिल ते १ मे १९९६
**मुलांसाठी :** २५ मे ते ३० मे १९९६
**वयोगट :** इ. ८ वी व वरील विद्यार्थ्यांसाठी
**शिबिरस्थान :** पुणे परिसर
**शिबिर शुल्क :** रु. ३००/-
(शिबिरकाळातील निवास-प्रवास-भोजन)

या शिबिरात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे ८ दिवस व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे घेण्यासाठी अन्यत्र पाठविले जाईल. त्यासाठी होणारा प्रवास - निवास - भोजनखर्च छात्र प्रबोधन द्वारा केला जाईल.

नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी दवडू नका. भविष्यात नेतृत्व करताना या शिबिराचा निश्चितच उपयोग होईल.

## N.T.S. प्रशिक्षण व अभ्यास मार्गदर्शन शिबिर

**कालावधी :** १८ मे ते २४ मे १९९६
**वयोगट :** इ. १० वीत जाणाऱ्यांसाठी
**शिबिरस्थान :** ज्ञान प्रबोधिनी, पुणे.
**शुल्क :** रु. ३००/-
(यामध्ये सुमारे १७५ रुपयांचे साहित्य, पुस्तके, टिपणे इ. दिले जाते.)

या शिबिरात राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेच्या मार्गदर्शना बरोबरच अभ्यास कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल.

शिबिर निवासी नसेल. तथापि ज्यांची पुण्यामध्ये अन्यत्र राहण्याची सोय होणार नाही अशांची निवासाची सोय ज्ञान प्रबोधिनीमध्ये होऊ शकेल. त्यांनी भोजनाचा खर्च रुपये २००/- स्वतंत्रपणे भरावा.

**याशिवाय ५ वी ते १० वी च्या मुलामुलींसाठी महाराष्ट्रात १८ शिबिरे.**

## संयोजक प्रशिक्षण शिबिर

ज्ञान प्रबोधिनीचे विविध शैक्षणिक प्रयोग व उपक्रम महाराष्ट्रातील अनेक धडपडणाऱ्या मुलामुलींपर्यंत पोहोचावेत यादृष्टीने ते सिद्ध झाले आहेत. विविध गावांमध्ये हे उपक्रम पुढील शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित करण्यासाठी युवक-युवती, पालक-शिक्षक यांचा पुढाकार आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसेवी वृत्तीने धडपड करू इच्छिणाऱ्या अन् आठवड्यात या कामासाठी किमान तीन तास वेळ देऊ शकणाऱ्या सर्वांसाठी 'संयोजक प्रशिक्षण शिबिर' आयोजित केले आहे.

**शिबिरस्थान :** पुणे     **शिबिर कालावधी :** २८ एप्रिल ते १ मे १९९६.
**शिबिर शुल्क :** रु. १००/- (शिबिर काळातील निवास-भोजन खर्चासह)

**शिबिर निवासी असणार असून प्रवेश संख्या मर्यादित असल्याने लवकरात लवकर स्थानिक कार्यालयात नावनोंदणी करावी.**

**या सर्व शिबिरांची तपशिलातील माहिती स्थानिक व मुख्य कार्यालयांमध्ये मिळू शकेल.**

ॐ

छात्र **प्रबोधन**

*वर्ष ४ अंक ९*
*सौर चैत्र, शके १९१८*

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
**मुखपृष्ठ**
खलील खान
**आतील चित्रे**
भास्कर सगर, पुणे
**अक्षर जुळवणी**
अक्षय एंटरप्राईजेस ॲण्ड सर्व्हिसेस
५१६ ब, नारायण पेठ, पुणे-३०
**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
☎ ४७७६९१
**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.
**वार्षिक वर्गणी**
रु. १००/-
**नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII
**प्रकाशन दिनांक**
सौर १ चैत्र, शके १९१८
२१ मार्च १९९६

## या अंकात दडलंय काय?

* संवाद २
* साकव ३
* कविता पानोपानी ८
* बीज अंकुरे अंकुरे - रोपवाटिका तयार करू या ९
* कथा - एक वेगळी पाटी ११
* उपयोग करू या - स्थानिक वनस्पती १६
* रूप पालटू देशाचे १७
* पहिली माझी ववी गं २१
* असे गणित... सर्वात हुशार शेतकरी २५
* माळरान फुलवू या २७
* करून तर पाहा - अन्न साठवण्याच्या पद्धती ३२
* डोळस बनू या ३३
* ग्रामीण आरोग्य ३५
* पाणी म्हणजे जीवन ३७
* खेड्याआई (यात्रा वर्णन) ४१
* गावकुसाचा विचारी विकास ४३
* स्थानिक केंद्रे ४८

संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

***भारत माझा देश आहे... सारे भारतीय माझे बांधव आहेत...*** *ही प्रार्थना आपण अनेक वर्ष म्हणत आहोत. शाळेतल्या चार भिंतींमध्ये अन् घरातल्या चार खोल्यांमध्ये राहून या वाक्याचा अर्थ आपल्याला कितीसा कळणार ?*

***खरं तर आपल्या देशात दोन देश असल्याचं अनेक वेळा जाणवत असतं.*** *संगणक-महासंगणक, दूरध्वनी-कॉर्डलेस-पेजर, केबल-दूरदर्शन, टाटासुमो-कॅडिलॅक असंच सारं वापरणारा, पेप्सी नी कोकाकोला पिण्यास चटावलेला, नुडल्स-इंस्टंट फूड खाणारा एक देश.*

*अन् एक शिक्षकी शाळाही नसणारा, देवळाच्या आवारात दाटीवाटीनं पहिली ते सातवीचे वर्ग कोंबलेले असणारा, पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल वणवण भटकायला लावणारा, दोन वेळच्या खाण्याचीही भ्रांत असणारा, बैलगाडीसारखं वाहनसुद्धा चैन मानणारा अन् अनवाणी पावलांचा दुसरा देश.*

*भौतिक सुविधा, वैज्ञानिक प्रगती आपल्या देशात कशी अन् किती पोहोचली याचं चित्रण करणारी ही दोन टोकं आज आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना पाहात आहोत.*

*'मेरा देश महान' चे नारे खरे करून दाखविण्याची जबाबदारी आपल्या परीने आपण प्रबोधकांनी स्वीकारायला हवी. त्यासाठी ७० ते ७५ टक्के भारतीय समाज जेथे राहतो तो ग्रामीण भाग, त्यांचे प्रश्न, त्यांच्यातील माणुसकी, संस्कृती, भाषा सर्व काही आपण समजून घ्यायला हवं. हा* ***ग्रामीण विशेषांक*** *तुम्हां सर्वांना त्याप्रकारची दृष्टी देईल असा विश्वास वाटतो.*

*आज आपले बहुतांशी सभासद शहरी भागातले आहेत. त्यांना या विशेषांकातून विविध ग्रामीण प्रश्नांची, ग्रामीण भाषा अन् संस्कृतीची ओळख होईल. एप्रिल, मेच्या सुट्टीत जमल्यास प्रत्यक्ष खेड्यात जाऊन त्यांनी ग्रामीण जीवनाशी अन् तेथील माणसांशी जवळीक साधा.* ***त्यातून 'भारत माझा देश आहे... सारे भारतीय माझे बांधव आहेत.' याचा अर्थ तुम्हाला समजायला लागेल.*** *आपणही आपल्या बांधवांसाठी काही केलं पाहिजे असं वाटू लागेल. जितक्या प्रबोधकांच्या मनात हा विचार रुजेल, तितक्या लवकर* ***'या माझ्या भारत देशी, सुख स्वप्ने फुलुनी यावी'*** *हे मलपृष्ठावरील गाण्यातले ध्रुपद वास्तवात येईल. या भूमिकेतून तुम्ही सर्वांनी या ग्रामीण विशेषांकाडे पाहावे.*

*आपल्या ग्रामीण भागातील प्रबोधकांना हा अंक अधिक जवळचा वाटेल असा विश्वास वाटतो. पुढील वर्षात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात तीन वेगळे-स्वतंत्र अंक काढण्याची आपली योजना आहे. ग्रामीण भागातील सभासद वाढवून हे प्रबोधक या योजनेला निश्चितच सहकार्य देतील. या अंकाबाबतच्या आपल्या सर्वांच्याच प्रतिक्रिया आवर्जून कळवा.*

*परीक्षेसाठी व प्रदीर्घ सुट्टीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा.* ***सुट्टीतील शिबिरांसाठी नावनोंदणी केली ना !*** *विविध शिबिरांच्या निमित्ताने समक्ष भेटूयात.* ***पुढचा अंक वासंतिक विशेषांक आहे बरं का !***

सस्नेह तुमचा

(महेन्द्र सेठिया)

**रेणू दांडेकर, दापोली, रत्नागिरी**

'साकव' तुम्हाला माहीत असेल हा शब्द. साकव म्हणजे पूल. दोन किनाऱ्यांना, दोन काठांना जोडणारा दुवा. खेड्यात विशेषत: कोकणात अशा पुलाला साकव म्हणतात. इथे सिमेंट, वाळू असं पक्कं बांधकाम नसतं. बांबू, काठ्या किंवा पोफळी आडव्या टाकून हा साकव बांधलेला असतो. लांब लांब साकाट्या (बारीक लाकडं) उभ्या आडव्या बांधतात. बांधतानाही कधी सुंभानं, कधी सोपटाने, कधी साकाट्या एकात एक गुंतवून ठेवतात. साकवावर टाकायचे बांबू मोळ्या प्रत्येक घरातून आणल्या जातात. प्रत्येक घरातलं एक माणूस श्रमासाठी येतं. वाडीवाडीनं काम पुरं होतं. पावसाळ्यात साकव लागतोच. धो धो अविरत पाऊस कोसळतो. बघता बघता नदी दुथडी भरून वाहू लागते. दोन गावांचा, दोन वाड्यांचा संपर्क या साकवानं जोडायचा असतो. हा साकव तयार होतो. माणसांच्या एकत्र येऊन केलेल्या श्रमातून अगदी असाच साकव आपल्याला बांधायचाय मित्रांनो! शहर आणि खेडं यांच्यात. मला आठवतंय एकदा मुंबईचा तरुण मुलांचा ग्रुप शाळेत आला होता.



त्यांनी पक्ष्यांच्या चित्रांच्या सुंदर स्लाईडस् आणल्या होत्या. मुलं पाहत होती. ती लवकरच चुळबूळ करायला लागली. एक मुलगा दुसऱ्याला म्हणत होता 'अरे हे पक्षी आम्ही रोज बघतो.' त्याहीपेक्षा वेगळे पक्षी जे स्लाईडस्‌मध्ये नव्हते ते त्यांच्यामुळे शहरातल्या मुलांना पाहायला मिळाले आणि शहरातल्या मुलांचा आनंद पाहून खेड्यातल्या मुलांना आश्चर्य वाटले.

आपल्याला असं साकव दोन मनात बांधायचंय. मग कसं बांधावं? त्याच्याविषयीचंच हे हितगुज. खरं तर प्रत्येकाच्या मनात 'खेडं' ही एक कल्पना ज्याची त्याची असते. 'रम्य खेडे कोकणामध्ये एक' असा समज असला तरी इथल्या मुलांची, त्यांच्या आईची आणि समाजाची दु:खं आपल्याला समजायला हवीत. कारण हे आपण दूर करायचंय, हे वाईट आहे, याची जाणीवच मुळी नाही. ही जाणीव इथल्या नि तिथल्या मुलांच्या मनात निर्माण झाली तर ? आपण प्रयत्न करू या. रस्ता शोधू या. नाहीतर नवी पायवाट तयार करू या. खेडं म्हटलं की झाडं, नदी, हिरवीगार शेतं, पक्षी अशा गोष्टी आपल्या डोळ्यांपुढे येतात. शाळेत निसर्गचित्र काढायला सांगितलं की आपण खेडं पाहिलं नसूनही असंच काढतो. अर्थात सगळी खेडी सारखीच नसतात. आपण शहरात राहत असलो तरी मूळचे सगळेच शहरातले नसतो.



कुणी तरी विचारतं 'तुम्ही कुठले ?' कधीही न पाहिलेल्या खेड्याचे नाव सांगतो. पुढं असंही म्हणतो 'कधी गेलो नाही हो आम्ही खेड्यात. कोण जातंय. सोयी आहेत कसल्या ?... नाव फक्त सांगायला ! आता आम्ही इथलेच.' मित्रांनो कधीही न पाहिलेल्या मनातल्या खेड्याला जरा जागं करू या. एकदा तरी इथलं जगणं बघू या.

दरवर्षी म. गांधी जयंती येते. साजरी करतो आपण ! स्वच्छता, प्रभात फेरी आणि मग भाषण. महत्त्वाचं वाक्य 'खेड्याकडे चला' असा संदेश म. गांधींनी दिला, आपण सभा जिंकतो, पण विचारांबरोबर गैरसोयी, तिथली एखादी शाळा असं बरंच काही पाहू या. इथं काही करायचं नाही. फक्त पाहायचंय. म्हणजे कल्पनेतल्या खेड्याच्या चित्रात वास्तवाचे रंग भरता येतील. ज्या घरी कधी गेलो नाही तिथे पाहुणेच आपण ! किंवा नवखा माणूस घरी आल्यावर 'या बसा' म्हणून स्वागत करू. कोण तुम्ही ? कुठून आलात ? कोण पाहिजे ? काय काम आहे ? आलेलं माणूस आपल्या फारसं जवळचं नसलं तर आपण घरात निघून जातो. खेड्यात गेल्यावर आपलीही अवस्था अशीच होणार पाहुण्यासारखी.

***महाराष्ट्र टाईम्स मधील 'रुजवा' लेखमाला, दिवाळी अंकांतील उत्कृष्ट लेखन यामुळे रेणूताई दांडेकरांचे लेखन आणि काम मराठी वाचकांपर्यंत केव्हाच पोहोचले आहे. शहरातील सुखसोयींपासून वंचित असलेल्या मुलांसाठी काही वेगळं करण्यासाठी धडपडणाऱ्या रेणूताई दांडेकर 'काही पिकत नाही तिथं बियाणं रुजवणं फार आनंददायी असतं.' अशा अतिशय बोलक्या शब्दात स्वत:च्या कामातील सार्थ आनंद व्यक्त करतात. रुजवायचं असेल तर मनामनांना जोडणारा पूल हवा ! हे त्या आवर्जून सांगतात.***

***लो. टिळकांचे जन्मगाव असलेले चिखलगाव ग्रामविकसनाचं केंद्र व्हावं म्हणून त्यांचा प्रयत्न चालू आहे. अध्यापक म्हणून तेथील मुलांत काम करताना आलेले हृद्य अनुभव त्यांनी येथे शब्दबद्ध केले आहेत.***

आचारावरही संस्कार झाले पाहिजेत. त्यासाठी आधी विचारांना अनुसरून आचार करण्यास प्रारंभ केला पाहिजे. मग असं करू या. गांधी जयंतीला फार लांबचं नाही पण जवळचं खेडं निवडू या, जिथं जरा चालावं लागेल, वेगळं जगणं दिसेल, चूल, जातं, उखळ, मुसळ, माती, शेतातले कष्ट,

जोडून सुटी असते. शिबिरांसाठी एकत्र जमतो आपण ! कधी गडकिल्ल्यांवर जातो. वाचायला लागतो. लिहायला लागतो. बोलायला लागतो. पोहायला लागतो. काय करू नि काय नको असं होतं. यात आणखी एक गोष्टीची भर टाकू या. जरा जगणं पाहू या. जरा जिथं खरा देश

जगतोय ती माती पाहू या. सुट्टी झाली की पालक थंड हवेच्या छानशा ठिकाणी मुलांना घेऊन जातात. थोडंसं रागावून घेऊन कोणी तरी मोठा दादा शोधून जरा खेड्यात जाऊ या. मित्रांनो म्हणून तर साकव हवंय. खोल दरीला जोडण्यासाठी. अशाच गावातल्या शाळेत जाऊ. मुलं जरा बिचकतील. कारण चांगले कपडे, फॅशन, बोलणं पाहून गांगरतील. कारण अशी साधी खेड्याकडची मुलं शहरात आली की खेडवळ म्हणून त्यांची चेष्टा होते, आपल्याला पैसे टाकले की सोय उपलब्ध होते, मार्गदर्शन मिळते, पुस्तकं असतात, पालक शिकलेले असतात. जिथं काही मिळत नाही, काही पिकत नाही तिथं बियाणं रुजवणं मित्रांनो फार आनंददायी असतं. चार चौघात कसं बोलावं, एखादा विषय कसा व्यक्त करावा याचं या मुलांना आपण प्रात्यक्षिक देऊ या. म्हणजे आपल्याला बरंच येतं आणि आपण त्यांना काही शिकवायचं असं नव्हे. उलट बस बंद पडली की आपलं अडतं. खेड्यातली मुलं रोज मैलोन्‌मैल चालतात. साप विंचवांना पकडतात. त्यांना अंधाराची भीती वाटत नाही. खूप प्रकारच्या वनस्पतींची अनेकांगी माहिती असते. आपल्याला हे शिकायचंय. एक शेतीतज्ज्ञ म्हणतात 'लोकांत जा, लोकांत मिसळा, लोकांकडून शिका आणि तुम्ही शिकलाय हे विसरून जा.' साकव बांधताना हे तर लक्षात ठेवायलाच हवं.

एकदा शहरातल्या एका घरात गेले मी ! चपलांचे बरेच जोड पाहिल्यावर मला वाटलं बरीचजण पाहुणी आली असावीत. जरा दबकत घरात गेले तर घरात कुणीच नाही. ७ वी, ८ वी तला मुलगा अभ्यास करीत होता. ''अरे, मला वाटलं क्लास वगैरे आहे की काय सुरू ?'' ''कमाल आहे तुझी काकी.'' ''अरे बऱ्याच चपला पाहिल्या म्हणून...'' ''सगळ्या माझ्याच आहेत. शाळेतल्या, घरातल्या, स्पोर्टसच्या, क्लासच्या, जरा कुठे खराब झालेल्या.'' हेवा वाटला मला त्याचा. अनवाणी पायानं दगडधोंड्यातनं मैलोन्‌मैल चालणारे कोवळे पाय दिसू लागले मला. असे अनवाणी पाय पाहू या. पुस्तकं वह्या घ्यायलाही पैसे नसतात अन् आपण वर्षाला तीन-तीनदा पुस्तकं घेतो. खेळाच्या सामानाबद्दल हेच असतं. खेड्यात मुलं निसर्गाशी खेळतात. हे पुस्तकाबाहेरचं जगणं समजण्यासाठी या नव्या साकवावरनं जाऊन अशा मित्रांशी दोस्ती करू या. अशा अनेक वस्तू जमवून आपण त्यांना देऊ शकतो. मदत म्हणून नाही कर्तव्य म्हणून. ज्यांना देणार आहोत त्यांनाही उपकाराचं ओझं नाही, मैत्रीची सावली मिळावी म्हणून. एके ठिकाणी अशीच पुस्तकं जमवली. मुलांनी जमलेली पुस्तके एका खेड्यातल्या शाळेत पाठवली. पुस्तकं



जमत गेली. जिथे वाचायला काहीच नव्हते तिथे लहानसं वाचनालय सुरू झालं. एक वाक्य आठवतंय, **देणाऱ्यानं असं द्यावं की घेणाऱ्याला वाटावं आपल्याला किती मिळालंय आणि देणाऱ्याला वाटावं आपलं काहीच गेलं नाही.**

अशा कितीतरी लहानमोठ्या साकाटच्यांनी हे साकव बांधायचंय आपल्याला. कारण माती अजून ओली आहे. झाडांना वाढायला वाव आहे. जगणं स्वच्छ, मनमोकळं आहे. माणूस माणसाला विचारतोय. गावात एखादा माणूस गेला तर गाव जमतं, दु:ख करतं, रडतं, गावचा आनंद सर्वांचा, गावचं लग्नकार्य सर्वांचं. म्हणून लग्नातल्या अशा जेवणाला गावजेवण म्हणतात. मित्रांनो आपण अजून लहान आहोत. नेहमीचीच गाणी ऐकायची सोडून कधी तरी गावाकडची गाणी ऐकू या, गोष्टी ऐकू या, नाच शिकू या. ग्रामगीतं, ग्रामकथा, ग्रामनृत्य म्हणजे लोकांनी जिवंत ठेवलेल्या कला समजून घेऊ, शिकू. हे फार आनंददायक. त्यासाठी सुरुवातीला सहलीच्या निमित्तानं, मग शिबिरांच्या निमित्तानं आपण तिथपर्यंत जाऊन पोचू या, पाहू या, अनुभव घेऊन येऊ या ! नंतर मोठं झाल्यावर काय करायचं ते कुणी तरी हळूच सांगेल मनात. हेच तर मनाचं प्रबोधन!


* * *

**जागेअभावी...** ग्रामीण विशेषांकासाठी महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील शाळा–संस्थांमधील अनेक विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्स्फूर्तपणे आपले लेखन पाठविले त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद ! ‘स्वप्नभूमी’, केरवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी; ‘सोनदरा गुरुकुल’ डोमरी, ता. पाटोदा, जि. बीड; हरीभाऊ चव्हाण आश्रमशाळा, लोणजे, ता. चाळीसगाव, जि. जळगाव; सुलाखे हायस्कूल, बार्शी, जि. सोलापूर येथील विद्यार्थी व शिक्षकांनी पाठविलेल्या लेखांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. एका अंकामध्ये या सर्वांचे लेख जागेअभावी छापणे अवघड आहे. यथाशक्य त्यातील निवडक लेखांचा ग्रामीण आवृत्त्यांमध्ये अथवा पुढील अंकांमध्ये समावेश होईल. तसेच ‘डोळस भटंकती’ व ‘उद्योजकांच्या कथा’ या नेहमीच्या लेखमालेतील प्रा. प्र. के. घाणेकर व प्रा. अजित कानिटकर यांचे लेख जागेअभावी या अंकात आम्ही छापू शकलो नाही त्याबद्दल क्षमस्व.

# घरघरतय गं जातं

*घरघरतय गं जातं, या पहाटच्या पार*
*पीठ जात्यानं गं दळं, दु:ख डोळ्यानं झरं...*
*कामं कामं बघु, काम कुठची भेटना,*
*बाई पोटाची ही आग, आग कुठही ईझंना....*
*खडी गं मी आता, आता किती फोडू बाई,*
*पगार पडंना, किडकी जवारी मी खाई....*
*साळंचा गुरुजी, का गं बाळाला कोपला,*
*बाई बाळ माजं येक, येक अक्सर चुकला...*
*या गं या बायावं, जीव काकूळसा व्हई,*
*हात लावा गं हाताला, जातं हलकं गं व्हई...*

**हिराबाई घोंघे,** राजगुरूनगर, जि. पुणे.



# बैलपोळा

*आला आला बैलपोळा*
*आहे सुट्टी, बंद शाळा,*
*मुले झाली सगळी गोळा*
*बैलांच्या गळ्यात घुंघुरमाळा.*
*मिरवणूक निघाली बैलांची,*
*मजा सगळ्या मुलांची.*
*ढोलकी वाजवत निघाले सगळे*
*ऊन पडले कोवळे कोवळे,*
*बैलांच्या पाठीवर रंगीत झुली*
*बैलांना ओवाळाया आई आली.*
*आता भुकेची जाणीव झाली*
*बैलांना पुरणपोळी आधी दिली,*
*मग आम्ही जेवलो पोटभरी.*
*झाला झाला बैलपोळा*
*उद्यापासून आहे शाळा.*

**कु. जयप्रदा बापूसाहेब जाधव**
सुलाखे हायस्कूल, बार्शी, जि. सोलापूर.



# मातीची ममता...

*माती जोजावते सानुले अंकुर ।*
*माती चोजवते कोवळा फुलोर ।।*
*माती पालविते दान अंबराचे ।*
*माती आळविते गान सृजनाचे ।।*
*माती जागविते ओढ जीवनाची ।।*
*माती वागविते लेणी कौतुकाची ।।*
*मातीची ममता अक्षर अपार ।*
*राखेतून फुले हिरवा संसार ।।*

**प्र. द. जोशी,** परभणी.

# बीज अंकुरे अंकुरे

**प्रा. अंजली तळेगावकर**

मनुष्याच्या जन्मापासून मरेपर्यंतचा एक खरा सोबती म्हणजे झाड! आपल्या सभोवातलचा परिसर हिरवागार करायचा असेल तर वृक्षसंवर्धन करायला हवे. त्यासाठी आवश्यक ती रोपं घरच्याघरी कशी तयार करता येतील ?

पावसापूर्वी रोपं तयार असतील, तर पावसाळ्यात ती जोम धरतील. त्याला फारसे पाणी घालावे लागणार नाही. फारसा खर्च न करता आपणास रोपवाटिका कशी तयार करता येईल हे पाहू या.

रोपवाटिका करताना पिशव्या भरण्यासाठी, गादी वाफ्यासाठी तसेच कुंड्यासाठी माती व खत यांचे मिश्रण घ्यावे.

**मिश्रणाचे प्रमाण**

१. काळी माती ८ घमेली

२. शेणखत/कंपोस्ट १ घमेले

३. बारीक पाचोळा ३ घमेली

४. कडू पेंड पाव किलो


पाचोळ्यामध्ये सुबाभूळ, घाणेरी, फूल न आलेले काँग्रेस गवत या अथवा कसल्याही पानांचा भुगा, फुलांचे निर्माल्य ह्या सर्वांचे मिश्रण चालेल. यातच बारीक केलेला गवती चहा घातल्यास अधिक चांगले.

कडू पेंड खताच्या दुकानात मिळते. हे जंतुनाशकाचे काम करते. कडू पेंड नसेल तर कडुलिंब अथवा करंज या झाडाची पाने बारीक चुरून घातली तरी चालेल.

या मिश्रणाने पिशव्या वरपर्यंत भराव्यात कारण पाणी घातल्यावर माती खाली बसते. पिशवीला खालच्या भागात ४-५ बारीक भोके काडीने अथवा खिळ्याने पाडावीत; म्हणजे जास्तीचे पाणी वाहून जाते. अशी पिशवी रोपे लावण्यास योग्य असते.

गादीवाफा करायचा असेल तर खाली गवत, पालापाचोळा अंथरावा व त्यावर ह्या मिश्रणाचा ६ इंचाचा थर द्यावा.

उन्हाळ्यात हिरडा, बेहडा, रिठा, शिकेकाई या बिया लावल्यास उगवतील. पाणी व्यवस्थित द्यायला हवे.



घरात लावण्यासाठी शेवगा, जांभूळ, चिकू, आंबा आणि अन्य फळझाडे लावणे शक्य आहे.

शेताच्या बांधावर कडुलिंब, करंज, निलगिरी, ग्लिरिसिडिया अशी झाडे लावल्यास त्यांच्या पानांपासून उत्तम नत्रयुक्त खत मिळते.

मोठ्या रस्त्याच्या कडेला झाडे लावायची असतील, तर गुलमोहोर, बहावा, कडुलिंब, चिंच, शिरीष, करंज अशा झाडांच्या बिया गोळा करून त्या लावाव्या.

रिठ्याचे बी चांगल्या कुजलेल्या शेणात तीन आठवडे पुरून ठेवतात. त्यानंतर गादीवाफ्यात पेरणी करतात. दोन आठवड्यानंतर उगवण सुरू होते ३-४ महिन्यात रोपे तयार होतात. हिरडा, बेहड्याचे बी लागवणी पूर्वी चोवीस तास थंड पाण्यात ठेवतात. शिकेकाईचे बी एक वर्षाच्या जुन्या शिकेकाईतून घ्यावे व गादीवाफ्यावर लावावे. शोभेच्या फुलझाडांचे बी गादीवाफ्यात पेरतात.

हा गादीवाफा सतत ओलसर राहील अशी व्यवस्था करावी. मग यासाठी छोट्या मडक्यात पाणी भरून ठिंबक सिंचन पद्धती वापरता येईल किंवा पाणी भरलेल्या बाटलीतून थेंब-थेंब पाणी पडेल, अशी व्यवस्था करता येईल. असा वाफा शक्यतो सावलीत करावा म्हणजे कडक उन्हाने, बिया वाळणार नाहीत.

एवढी काळजी घेतल्यानंतर १५ ते २० दिवस वाट पाहावी लागते. कोणत्या बिया कोठे लावल्या आहेत, याची नोंद केलेली बरी ! म्हणजे कोणते झाड उगवले आहे हे निश्चित कळेल किंवा एका गादीवाफ्यात एकाच प्रकारच्या बिया लावाव्या. रोप साधारण ५-६ इंच (वीतभर) उंच झाल्यावर अलगद उचलून पिशवीत लावावे व रोज पाणी घालावे. प्रत्येकानं एक तरी झाड लावून स्वत:ला लागणाऱ्या प्राणवायूची सोय करावी व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी हातभार लावावा.

* * *

## जरा हसू या

एकदा एक जपानी माणूस भारत बघायला आला होता. दिल्लीत पोहोचल्यावर टॅक्सी करून त्याने ड्रायव्हरला मोठ्या हॉटेलमध्ये न्यायला सांगितले. संध्याकाळची वेळ असल्याने वाटेत खुपदा सिग्नल लागले. गर्दीमुळेही टॅक्सी थांबत थांबत गेली. तो जपानी माणूस ड्रायव्हरला म्हणाला, ''तुमच्या इथे फार संथ-सावकाश चालू आहे बाबा ! जपानमध्ये सगळं कसं फास्ट असतं.''

शेवटी टॅक्सी त्या प्रसिद्ध हॉटेलपाशी थांबली. जपानी माणूस टॅक्सीतून खाली उतरला अन् बिलाबात चौकशी करू लागला. ड्रायव्हरने ८५० रुपये बिल झाल्याचे सांगितले. ''आँ इतकं बिल कसं काय !'' आश्चर्यचकित होऊन जपानी माणसाने विचारले. त्यावर ड्रायव्हर म्हणाला, ''त्यात आश्चर्य करण्यासारखे काय आहे. हा मीटर जपानमध्येच तयार झाला आहे. त्यामुळे तो फास्ट फिरणारच.''

**संकलन - नरेंद्र रानडे, सांगली**

# एक वेगळी पाटी

**नीता ओसवाल**

बीड शहरापासून ३० कि.मी. अंतरावरचं गाव! डिंगरी त्याचं नाव. पाण्याचा हाहा:कार, दोन घासांची मारामार, अशा ठिकाणी शिक्षणाचा अंध:कार!

उन्हाळ्याचे दिवस होते. पावसाळ्यात साठलेलं गावातलं पाणी जवळजवळ संपलं होतं. सुभाषचे आई-बापू रोजगार हमी योजनेवर रस्ता करायला जात होते. सुभाष अजून लहान होता, दहा वर्षाचा. घरीच थांबायचा.

गोठ्यातल्या जनावरांना वैरण मिळत नव्हती. दुष्काळी कामावर मिळालेले सर्व पैसे फक्त त्या तिघांच्या जेवणावरतीच खर्च व्हायचे. एकंदर परिस्थिती भयानक होती.

सुभाष लहान होता. विचार करण्याचं त्याचं वयही नव्हतं. पण काय होतंय याचं निरीक्षण चाललं होतं. आई-बापू आणि तो सहा महिने बारामती जवळच्या साखर कारखान्यात ऊस तोडायला जायचे. सहा महिने गावात असायचे.



त्याने एकदा आईला विचारले, ''आये, आपल्याला सा महिने कारखान्याकडं का जावं लागतं ?''

''आरं राजा, पोटासाठी काही कराया नगं का ? आपून कष्ट करून पैसे मिळवतो. म्हणून जायाचं.''

''मग आये, आपल्याकडं कष्टाशिवाय दुसरं काय बी नाय ?''

''नाय एवढं खरं,'' आईला, सुभाषच्या अशाच प्रश्नांना जेवढी उत्तरं देता येत होती तेवढी तिने दिली.

सुभाष हिरमुसला. 'आपण कष्ट तर करायचेच. पन येगळं कायतरी करायचं.'

त्या दिवशी सकाळी उठून तो सखारामकडे गेला. त्याच्यापेक्षा वयानं तो चार वर्षानं मोठा. ऊस तोडायला फडावर जायचा. गाडी भरायचा. छान बासरी वाजवायचा.

''सुभ्या अरे, जसा मोठ्ठा होतोयस तसा लौकर उठतोयस की रं ?''

''नाय रं, तात्या.'' थोडं थांबून सुभाष म्हणाला, ''तात्या आय म्हणाली, 'आपन पोटासाठी कारखान्यावर जातो.' म्हणून.''

''व्हय, बरोबरच हाय.''

''तात्या, आपन दुसरं काय तरी केलं पाहिज्ये. आपल्याला जमल का रे ?''

''शिकलं तर जमल की ?''

''मग मला शिकायचं हाय.''

''सुभ्या, खरंच मोठा झालास. या वर्साला तू मास्तरकडं जा. अन् शिकायला लाग. येगळं काहीतरी कर !''

''शिकायचं म्हंजी पुस्तकातून वाचितात तसं ?''

''हो, मी सांगतो काकीला.''

''पण, कारखान्यावर जावं लागल रं मला.''

''तोवर तर शिक. तेवढंच दोन-चार धडं.'' सुभाष हसला. सखातात्याशी बोलल्यानंतर त्याला नेहमीच बरं वाटतं.

त्याच आनंदात तो घरी आला, ''आये मी शाळंत जानार हाय.'' आई दळण करता करता जातं तसंच ठेवीत म्हणाली, 'आरं सुभ्या, सा महिनं शाळा बुडल कीरं.''

''आयं, तोवर तर शिकीन.'' आईनं पटल्यागत मान डोलावली.

सखारामही एकदा सुभाषच्या आईला भेटून गेला. तसे सखारामला सगळेच मानायचे. चार बुकं शिकला होता ना तो.

उन्हाळा संपला. जिरायती पिकाची नांगरणी झाली. जून महिन्याच्या सुरुवातीला भीज पाऊस पडला. शेतकरी पेरणी करू लागले, नव्या आशेने !

सुभाष नव्या आशेने सुट्टी संपवून परत आलेल्या मास्तरकडे गेला, ''मास्तर मला शिकवाल का ?'' मास्तर चांगले होते. गावात त्यांना मान होता. सर्व मुलांना चांगली वळणं लावली होती त्यांनी !

''कोण ? सुभाष. ये बस.''

''मास्तर, मला शिकायचं हाय. मला ऊ-ऊसाचा येतो, फ-फडाचा येतो, क-कष्टाचा येतो.''

जयंत मास्तरांना सुभाषची तळमळ माहीत होती. ते म्हणाले, ''मला माहिती आहे ते. तू शिकशील. खूप मोठा होशील. पण रोज येणार का ?''

स्वत: मोठं झाल्याचं स्वप्न पाहत सुभाष म्हणाला, ''मास्तर शाळंत नाय बसू शकणार. माझ्या बरूबरीची मुलं खूप शाहानी झालीत. मी तिथं नाय येणार.''

''तू रोज रात्री ये जेवून. माझ्याकडेच झोप. तवा आपण शिकू.''

मान डोलवत सुभाषनं विचारलं, ''आजपासून येऊ ?''

''ये.'' असं म्हणून मास्तर रोजच्या कामाला लागले.

बापू पेरणीची कामं करून घरी आले होते. आई भाकरी करत होती.

''सुभ्या, शेतावर का नाय आला ?'' बापूंनी करड्या आवाजात विचारले. सुभाष काही बोलण्याच्या आधी, ''इट्टी-दांडू खेळत गेला असंल शिवारापर्यंत.'' भाकरी करत आई म्हणाली.

तो शांतपणे उभा होता. ''कुठं व्हतास ?'' ''बापू, मी मास्तरकडं गेलो व्हतो.''

''काय ? म्हंजे तू साळंत जानार की काय आता ?''

''नाय. रोज रातच्याला झोपाया जानार हाय मास्तरकडं. तवा शिकिवणार हाय मास्तर.''

''ते तुझं तू बघ. आता तू मोठ्ठा झाला. शेताला यायला नगं ? बाकी तू काय बी कर.''

''व्हयं.'' सुभाष थोडा मुसमुसला. पण रडला नाही. आपण इतर सर्वांना वेगळं काहीतरी द्यायचं आहे. हे त्यानं ठरवलं होतं. गेले काही दिवस विचार करताना तो वेडा झाला होता. झाडाच्या फांदीवरचे पक्षी कुजबूज करायचे. पावसाळ्याचा मंद, गार वारा शीळ घालायचा. वेडा झालेला सुभाष त्यातून ऐकायचा, 'आमचं गीत गा.'

बापूंचा राग होता शिकायला. त्यांचंसुद्धा बरोबर होतं. आधीच शेतावरच्या कामाचे हात कमी ! त्यात मजूर लावायला पैसेही नसत. त्यामुळे सुभाषची वरकामाला मदत व्हायची.

इकडे सुभाषनेही ठरवलं होतं, त्याची कष्टाची तयारी होती. वंश परंपरेने तो गुण त्याच्याकडे आला होता. त्यानंतर अनेक दिवस सुभाषला मास्तरकडं जाता आलं नाही. पण या मधल्या काळात सुभाषनं आईची तयारी करून घेतली.

'तो' दिवस सुरू झाला. चार घागरी पाणी आणलं. शेण-गोठा केला.

पावसाळ्यामुळे गुरांना चांगला चारा मिळत होता. दूध काढता येत होतं. सकाळची कामं झाली. बापू लवकरच गुरांना घेऊन शेतावर गेले होते. सुभाषचं आईला भाकरी-कालवणासाठी मदत करणं चालू होतं. आईचं घर सारवून झालं. मग आई अन् सुभाष निघाले शेताकडं !

पेरणी संपली होती. खुरपणी चालू होती. आई-बापू दोघेच शेतावर राबायचे. शेत छोटंच. एक एकर. आता सुभाषमुळं खुरपणीसाठी दोन हात वाढले. दिवसभर खुरपणीच चालू होती. दुपारी खूप उन्हं तापली. थोडं मळभ होतं. पण वारा गरमच. दुपारी भाकरी-कालवण आंब्याखाली बसून खाल्ली. परत काम सुरू.

दिवस मावळला. आईबरोबर सुभाष गुरांना घेऊन घरी आला. सुभाषने गुरांना गोठ्यात बांधले. बापू अजून शेतावरच. आईनं बत्ती लावली. चूल सुरू केली. हात-पाय धुऊन सुभाष भूक-भूक करीत होता. सकाळचीच भाकरी कांद्याबरोबर खाल्ली. तांब्याभर पाणी पिऊन नव्या उत्साहानं आज तरी मास्तरकडं जायचंच म्हणून तयार झाला.

''सुभ्या, आरं सुंभ्या.'' बापूंचा आवाज ''आरं उपरणं ठेव जरा आत.'' सुभाष जायचा थांबला. उपरणं आत ठेवलं.

''आये मी जातोय.''

''निघ. सकाळी धारेला ये लौकर.'' मान डोलवली अन् सुभाष सटकला मास्तरकडं. मास्तर गावाच्या त्या टोकाला राहायचे. सुभाषला पाहून मास्तर म्हणाले,

''मला वाटलं, आता तू यायचा नाहीस.''

''बापू रागावले.''

''समजलं ते, मग ?''

''मग काय. रातच्याला जानार म्हणालो तवा तयार झाले.''

''इथंच राहतोयस ना ?'' प्रश्नावर सुभाषनं होकारार्थी मान डोलावली. मास्तर आत गेले पुस्तक, पाटी घेऊन आले.

''मास्तर, एक प्रश्न विचारू ?''

''विचार की.''

''मला येडं नाय ना म्हणणार ?''

''नाय रे.''

''सखातात्या म्हणाला की तुम्ही मला येगळं काहीतरी सांगाल म्हणून.'' एक क्षणभर थांबून, ''नक्की सांगाल.''

''बोल तर खरं ?''

''मला, पक्षी, वारा, पानं सारे म्हणतात. आमचं गानं म्हन. मला तसं गानं म्हनायचंय, सांगाल का ?''

शिवाराकडून त्याच वेळेला रात्री वाहणाऱ्या वाऱ्याची शीळ घुमली. मास्तर पाटीवर काढत होते, 'शीळ' ''सुभाष माझ्याकडं बघ. हा-श, त्याला असा काना दिला की शा, त्याला वेलांटी दिली की 'शी' आणि हा असा दोन उंबरं जवळजवळ ठेवल्यासारखा 'ळ' शीळ.''

आनंदाच्या भरात पाटी बाजूला ठेऊन सुभाष काठीनं धुळीतच अक्षरं काढत होता. ''शी ळ,'' ''शीळ.'' धुळीतली धुळाक्षरं स्पष्ट दिसत होती. सुभाषनं जोरात शीळ वाजवली. पुन्हा मातीत रेखाटू लागला. 'शीळ' आता अधिक जोरात शीळ वाजवली.

''मास्तर शीळ जो वाजवितो तो वारा कसा लिहायचा ?''

''हे बघ एक आडवी वाटी त्याला दांडी 'व' अन् नवीन पालवी फुटते तेव्हा जसं दिसतं तसा 'र,' या दोघांना दांड्या द्यायच्या म्हणजे ''वारा.''

'वारां सुभाषनं धुळीत काढून पाहिलं. ''सुभाष मी आलोच.'' मास्तर खोलीत गेले.

धुळीच्या पाटीवर 'शील' आणि 'वारा' काढत सुभाष कितीतरी वेळ बसला होता. ''आत येतोस ?'' मास्तर म्हणाले. सुभाष दचकला, ''मास्तर, बघा'' सर्व अंगणभर 'शीळ' अन् 'वारा' लिहिलं होतं ते सुभाषनं दाखवलं.

''छान सुभाषराजा, आत झोपू या. उद्या पुढचं शिकू.'' जयंत मास्तर त्याची पाठ थोपटत होते.

''व्हय मास्तर, सकाळी लौकर जायचं हाय घराकडं.''

सुभाष मनातल्या मनात अक्षर घोळवीत झोपी गेला.

* * *



# उपयोग करू या - स्थानिक वनस्पती

**माधव शिंदे,** 'स्वप्नभूमी', केरवाडी, जि. परभणी.

आपल्या परिसरामध्ये अनेक वनस्पती असतात. त्यांची माहिती आपल्या आजीला, तेवढ्या वयाच्या इतरांनाही असते. पुढे काही वनस्पतींचा उपयोग कशाकशासाठी करतात ते दिले आहे. आपणही आपल्या विश्वातले छोटेसे 'उपयुक्त सल्ला देणारे' डॉक्टर होऊ या.

**१) कडुलिंब :** लिंबाची काडी दात घासण्यासाठी वापरतात. कडुलिंबाचा पाला साप चावल्यावर खायला देतात. नारू आल्यावर कडुलिंबाचा पाला त्यावर बांधतात. नखुर्ड झाल्यावर कडुलिंबाचा पाला आणि मीठ वाटून तुपामध्ये मिसळून त्यावर बांधतात तसेच आंब्याचा डिंक लिंबाच्या रसात मिसळून लावतात. कडुलिंबाचा पाला वाटून तो रस खरूजेच्या फोडावर लावतात.

**२) उंबर :** उंबराच्या मुळ्या पाण्यामध्ये वाटून गोवर आल्यावर प्यायला देतात. अंगावर चट्टे आले असतील तर उंबराचे फळ व त्याच्या सालीचा रस त्यावर लावून चोळतात. उंबराच्या बुडाची सालं बारीक वाटून जखमेवर लावतात. विंचू चावला तर उंबराच्या पानाचा रस लावतात. उन्हाळी लागल्यावर उंबराच्या कोवळ्या पानात जिरे, साखर घालून वाटतात व पाण्यामध्ये मिसळून पितात. घोळणा फुटल्यावर उंबराची सालं वाटून टाळूवर लावतात.

**३) आंबा :** आंब्याची पाने पाण्यात उकळून घसा बसल्यावर गुळण्या करतात. भाजल्यावर खोडाची सालं वाटून खोबरेल तेलातून लावतात. पायाला चिरा पडल्यावर आंब्याचा डिंक लिंबाच्या रसात मिसळून लावतात.

**४) पिंपळ :** पायाला चिरा पडल्यावर पिंपळाचं दूध त्यावर लावतात. पायाची जळजळ होऊ लागल्यावर पिंपळाच्या व मेंदीच्या पानाचा रस त्यावर लावतात. डांग्या खोकला आल्यावर पिंपळाच्या बुडाची साल उगाळून चाटतात.

**५) लिंबू :** उलट्या होत असल्यावर लिंबाचे साखर घालून सरबत पाजतात. कान फुटल्यावर लिंबाच्या रसाचे ४-५ थेंब कानात टाकतात. डोकं दुखू लागल्यावर लिंबाचा रस २-३ थेंब नाकात टाकतात. पोट दुखू लागल्यावर लिंबाच्या दोन फोडी घेऊन हळद आणि मीठ लावून खातात.

**६) बोरी :** जखम झाल्यावर बोराची साल बारीक वाटून त्यावर लावतात. तोंड आल्यावर बोरी व बाभळीची साल एकत्र पाण्यामध्ये उकळून गुळण्या करतात. केसतुड आल्यावर बोरीचा पाला वाटून लावतात.

**७) पपई :** गाल फुगल्यावर कच्च्या पपईचा चिकट रस त्यावर लावतात. विंचू चावल्यावर पपईचे दूध चावलेल्या जागी लावतात.

**८) बिब्बा :** ठेच लागल्यावर बिब्बा कापसात गुंडाळून वाटतात व त्यावर बांधतात. घसा दुखू लागल्यावर बिब्ब्याचे तेल कपभर दूधामध्ये २-३ थेंब मिसळून पितात. पायाला चिरा पडल्यावर बिब्ब्याचे तेल ३-४ दिवस त्यावर लावतात.

* * *

# रूप पालटू देशाचे

**प्रा. सुभाष देशपांडे**

आपला देश हा खेड्यांचा देश आहे. प्रबोधिनीमध्ये आपण विद्यार्थी जेव्हा या देशाला पुन्हा गौरवाचे स्थान प्राप्त करून देऊ असे म्हणतो तेव्हा हे खेड्यातले जीवन अधिक चांगले व्हावे अशी आपली इच्छा असते. खेडी पालटायची म्हणजे काय? याचा एखादा नमुना करून दाखविला पाहिजे असा विचार प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. आप्पासाहेब पेंडसे यांच्या मनात अगदी सुरुवातीपासून होता.

बसलेली खेडी, शिवगंगेच्या पलीकडे गुंजवणी नदीचं खोरं आहे. या दोन्ही खोऱ्यांमध्ये मिळून १३७ गावे वसली आहेत. सिंहगड, तोरणा, राजगड आणि पुरंदर या चार ऐतिहासिक किल्ल्यांनी वेढलेला हा 'शिवप्रदेश' आहे. खेड शिवापूर हे त्यातलं मध्यवर्ती गाव. शिवाजी महाराजांचे बालपण काही दिवस इथेच गेलं. त्यांचे गुरू दादोजी कोंडदेव यांनी लावलेल्या आंब्याच्या



पुणे–सातारा रस्त्यावर कात्रज घाट ओलांडला की शिवगंगा नदीचं खोरं लागतं. खोरं म्हणजे नदीचे पात्र आणि तिच्या दोन्ही बाजूंना असलेल्या पर्वतांमध्ये

बागेची गोष्ट आहे, तीही इथलीच. अशा या ऐतिहासिक परिसराची १९६० मध्ये काय स्थिती होती? जिराईत शेतीमध्ये येणारं भात हेच प्रमुख उत्पन्न. ज्यांना

जमिनी थोड्या त्या घरातली कर्ती मुलं नोकरी - धंद्यासाठी पुण्या-मुंबईकडे पळालेली. पावसाळ्यात सपाटून पाऊस आणि उन्हाळ्यात मात्र पिण्याच्या पाण्याचे सुद्धा हाल. अनेक गावांमधून एस्.टी. रस्त्याला यायला धड कच्चा रस्ता सुद्धा नव्हता. अनेक खेड्यात वीजही पोहोचलेली नव्हती.

प्रबोधिनीने यावर उपाय म्हणून 'शिवगंगा खोरे विकास योजना' असा एक विभागच सुरू केला. सुरुवातीला सडकेला भिडणारे रस्ते तयार करणे, गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खोल करणे असे उपक्रम सुरू केले. खते, बी-बियाणे वाजवी दरामध्ये शेतकऱ्यांना पुरवणं हेही आवश्यक होतं. एवढेच नव्हे तर डिझेल इंजिने आणि ट्रॅक्टर यांची सोयही भाड्याने करण्याची आवश्यकता होती.

डोंगराळ भागामध्ये कालव्याच्या पाण्याची सोय होणे तसे अवघडच. शिवगंगा खोऱ्यातही कुठल्याही मोठ्या धरणाची अशी सोय होणे शक्य नव्हते. त्यामुळे नुसत्या शेतीतून घरखर्च भागणे अवघड जात होते. म्हणून शेतीला उद्योगाची जोड देण्याची कल्पना निघाली. सुप्रसिद्ध उद्योगपती कै. श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी १९३८ मध्ये खेड-शिवापूर परिसराची पाहणी केली. विविध गावांमधून ६० तरुणांची निवड करण्यात आली आणि त्यांना खडकी येथे किर्लोस्कर आईल इंजिन्समध्ये तांत्रिक शिक्षण देण्यात आले. १९७१ मध्ये शिवापूरला कारखान्याचे बांधकाम झाले आणि त्यात किर्लोस्कर-ज्ञान प्रबोधिनी यंत्रशाळा सुरू झाली. किर्लोस्करांनी वेगवेगळ्या प्रकारची सुमारे ४० यंत्रे वापरावयास दिली. अशा तऱ्हेने शिक्षणक्षेत्रातील प्रबोधिनीने पहिले अध्यक्ष मुंबईचे उद्योगपती कै. मो. ग. कोटीभास्कर यांची आठवण राहावी म्हणून या कारखान्याला 'कोटीभास्कर स्मृती उद्योग' असे नाव देण्यात आले. आजवर या यंत्रशाळेमध्ये सुमारे १२०० तरुणांनी तांत्रिक शिक्षण घेतले. त्यातील १५० लोक कारखान्यात प्रत्यक्ष काम करीत आहेत. उरलेल्यांना परिसरातील इतर कारखान्यांमध्ये नोकऱ्या मिळाल्या. त्यातील सुमारे २० जणांनी स्वत:चे छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू केले.

या कारखान्यात काम करणारे हे १५० जण बाहेरच्या अर्थाने केवळ कामगार नव्हते तर ते प्रबोधिनीचे कर्मचारी सदस्य आहेत. इतकेच नव्हे तर प्रबोधिनीच्या ग्रामविकसन कार्याचे ते आपापल्या खेड्यातील प्रतिनिधी आहेत. त्यातील अनेकजण ग्रामपंचायत सदस्य बनले, काहीजण सरपंच झाले आणि आपापल्या

गावाच्या विकासात ते महत्त्वाचा पुढाकार घेऊ लागले.

गावाच्या विकासाची प्रबोधिनीची कल्पना काय आहे. मलपृष्ठावरील पद्यात म्हटले आहे -

*''एकजीव उमदे व्हावे, जनजीवन गावोगावी'*
*या माझ्या भारत देशी, सुख स्वप्ने फुलूनी यावी.''*

अशा तऱ्हेने एकजीव झालेल्या गावामध्ये सुख-समृद्धी आणण्यासाठी किंवा दुसऱ्या भाषेत नीतिमंत - श्रीमंती आणण्यासाठी दारूबंदी चळवळ, चांगल्या शिक्षणाचा प्रसार, तरुण मंडळे आणि महिला मंडळे याद्वारे गावाचे संघटन करण्याचा प्रबोधनीचा प्रयत्न असतो.

खेड्यातील काही महत्त्वाचे प्रश्न निवडून त्यावर प्रबोधिनी काम करते.

''पाणी, ऊर्जा हाताला काम
संख्या, शिक्षण, संघटित ग्राम''

असे प्रबोधिनीचे कामाचे धोरण आहे. पिण्याच्या पाण्यापासून आठमयी बागायतीपर्यंत उपयोगी पडणारा पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, बायोगॅस इ. जळणाचे पर्याय, नोकरी आणि स्वत:चा उद्योग-धंदा यांना उत्तेजन या तीन प्रश्नांवर शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यामधील गावांमध्ये प्रबोधिनीचे काम चालते. वाढत्या लोकसंख्या प्रश्नांची जाणीव निर्माण करण्यासाठी लोकशिक्षण आणि गावाच्या विकासात गावकऱ्यांनीच पुढाकार घ्यावा यासाठी लोकसहभाग ही प्रबोधिनीच्या कामाची महत्त्वाची सूत्रे आहेत.

प्रबोधिनीच्या शाळेतील विद्यार्थी या खेड्यांमध्ये शिबिरांसाठी जातात. घरा-घरांमध्ये जाऊन तेथील जीवन अनुभतात. समवस्यकांशी दोस्ती करतात. **इतर जिल्ह्यांमधील छात्र प्रबोधनचे वाचकही शिबिरांसाठी या शिव-प्रदेशात येत असतात.** खेड्यामध्ये वाहतूकीची कोंडी आणि धूराचे प्रदूषण नसते. या मोकळ्या वातावरणाच्या जोडीला शहरातील बहुसंख्य सोयी जर खेड्यात मिळाल्या तर खेड्यातले जीवन शहरापेक्षा अधिक सुखकारक वाटू लागेल.

शाळा, दवाखाने यांचीही सोय शिवापूर परिसरात चांगली झाली आहे. सिंहगड किल्ला अगदी पायी अंतरावर दिसतो. दर अर्ध्या तासाला आता बस सुरू झाली आहे. जवळ जवळ ३०० लहान-मोठ्या कारखान्यांनी या दोन्ही खोऱ्यातील परिसर व्यापला आहे. सणसवाडी आणि ससेवाडी यासारख्या गावांमध्ये पाणलोट विकास क्षेत्राचे काम सुरू आहेच. त्यामुळे उन्हाळ्यातही तेथे गारवा वाटतो. राजगड, तोरणा आणि पुरंदर हे किल्ले सुट्टीतल्या सहलीसाठी खुणावत असतात. या गड किल्ल्यांवर शाळा-कॉलेजमध्ये असताना

हिंडलेले अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी आता प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या मोठ्या जबाबदाऱ्या पेलत आहेत. खऱ्या अर्थाने भारत हा खेड्यांचा देश आहे. ही जाणीव तरुणांमध्ये निर्माण झाली तरच देशाच्या विकासास मदत होईल.

* * *


## प्रबोधिनीच्या ग्रामविकसन कार्यातील महत्त्वाचे विषय

| पाणलोट क्षेत्र विकास | ऊर्जा | स्वयंरोजगार | संघटन | आरोग्य | शेती |
|---|---|---|---|---|---|
| B ससेवाडी येथील डॅनिडा प्रकल्प | B ससेवाडीतील गोमसंयंत्र (बायोगॅस) बांधकाम | B शिवगंगा महिला उद्योग | B किशोरी विकास प्रकल्प | B आरोग्य प्रबोधिका | B शिवापूर येथे १० एकर केंद्र परिसर विकास |
| B सणसवाडी येथील नाबार्ड प्रकल्प | B ॲफ्रो-मिनी प्लँटस् व स्लरी प्रात्यक्षिक | B वेल्हे येथे स्वयंरोजगार प्रशिक्षण वर्ग | B महिलांचे बचत गट | B नेत्र सेवा शिवापूर व शिरवळ | B शेती सुधारणा मंडळ |
| B कपार्टद्वारा पाणलोट प्रशिक्षण प्रकल्प | B गोमसंयंत्रांची टर्न-की पद्धतीने बांधणी | B औषधी व सुगंधी वनस्पती लागवड | B स्त्री शक्ती जागरण प्रकल्प | B शिवापूर येथे संडा बांधकाम | B सेंद्रिय शेती प्रकल्प |

या व्यतिरिक्त कृषितांत्रिक विद्यालय, शिवापूर, ग्राम प्रबोधिनी साळुंब्रे, कोटीभास्कर स्मृती उद्योग, सर्वंकष ग्रामीण आरोग्य योजना (कुष्ठरोग निर्मूलन), इत्यादी ज्ञान प्रबोधिनीचे विभाग ग्रामीण भागात कार्यरत आहेत.

**ज्ञान प्रबोधिनीचे ग्राम विकसनाचे कार्यक्षेत्र**

**शिवगंगा व गुंजवणी खोरे विकास योजना, जि. पुणे.**



# पहिली माझी ववी गं

**सौ. सिंधू सुदाम भोंडवे,**
गुरूकुल, डोमरी, जि. बीड



गेला आमचा जमाना. तवाचा काळच लई अबलुक बघा. आताच्यावनी पीठाच्या गिरण्या-फिरण्या काई नव्हतं. आम्ही कोंबडं कोकलं की, उठायचोत; जात्यावर बसून पायलीभर दळणाचा फडशा पाडायचोत. आता येव्हडं मोठं जातं वढायला त्याला हुरूप तर पाहिजे, की मग आमी वव्या मनायचो. येरवी एक सबुत सुचत नाही बगा, पण खिनबर जात्यावर बसलं अन् पाळूतून पीट पडायला लागलं की, आमच्या पोटातलं गाणं व्हटात यायचं. उगंच मनीत नाहीत जात्यावर बसलं की ववी सुचते, पण आमची गाणी आत्ताच्या गाण्यासारखी आंबटचिंबट, येडीइद्री नव्हती बया. अगदी भारनसुद, खानदानी अगदी शंबरनंब्री, गुळधाव सोनं. त्या गाण्यात कवा दळाण होत असं त्याचा पत्त्या लागत नसं. तसं कश्याला च्यार, दोन वव्याच मनते की, पण हसू नका बया. तुमी पुण्याचं 'परबोधन' वाचणारे शिकलेले, सवरलेले. मला नाई बया तुमच्यासारखं बोलता येत.

कोणाच्या बी जमान्यात आईचं कवतिक कुणाला बी असतं. आईवरच्या वव्या मला लई येत्यात बघा. तुमा-आमाला देव कुटं भेटायचं ? असं वाटतं.

***देवाला लई काम देव येईना घरूघरी ।***
***आई पाठून त्यानं केली बरूबरी ।।***

देवायेगळी आई मुळीच नाही म्हणून देवाअगुदर आईलाच मान द्यायला पाहिजी.

आजकालचे गाबडे आईचा तीळभर मान राखीत नाहीत पण आमी मातर आईचा एकेक शबुद हुरध्यात झेलायचो.

*नवू महिणं वजं वागीवलं डाव्याकुशी।*
*आई तुला मागारी बोलु कशी ।।*

कसंबी असलं तर बोलून-चालून नव्हतं.

*अरूण्यावनामधी कोण रडतं ऐका।*
*सीताला समजावा बोरी, बाभळी बायका ।।*

अवो बाळातील झाली तर निवारा सुदीक नव्हता.

*अरूण्यावनामधी काय दिसतं लालीलाल।*
*सीतामाय बाळातीन दिलं लुगड्याचं पाल।।*

फुलावानी आबलुक लवकुश बाळं झाली. पण त्यांना सादं बाळुतं सुद्धा नव्हतं.

*'स्वत:च्या गावात स्वत:च काही बदल करायला हवेत' या दीन दयाळ संस्थेच्या विचारांनी प्रेरित होऊन श्री. सुदाम भोंडवे यांनी काही तरी करायचं ठरवलं आणि डोमरी गावातील सोनदरा गुरूकुलाची कल्पना जन्माला आली. मराठवाड्यातील खेड्यात वाढलेल्या सिंधूताई, औपचारिक शिक्षण फारसे नसले तरी आपल्या पतीच्या कार्यात सक्रिय वाटा उचलत आहेत. गावापासून दूर, उघड्या माळरानात गुरूकुलाचं स्वप्न साकार करण्यात सिंधूताई मग्न आहेत. हा लेख वाचताना ओवी या परंपरागत चालत आलेल्या गीत प्रकाराने मराठी वाङ्मय किती समृद्ध केले आहे हा अनुभव येतो आणि नकळत भारतातील खेड्यांतील स्त्रीच्या जीवनाचा, तिच्या भावबंधांचा एक आलेख डोळ्यासमोर येतो.*

लेकीची जात कवातरी आईला सोडावंच लागतं. पोटचा गोळा असून शेजारीन होऊन राहावं लागतं.

*नवू महिणं वजं वागवीलं मला।*
*आई शेजारीन झाले तुला।।*

जलुमभर आईचं गुण गायले तरी कमीच पडतील. आई इतकीच सीतामाय मोठी. बघा ना सीतामाय राजाची लेक. राजाची बायकु पण तिचं जीनं मंजी काट्याचं हातरून. कसं सोसलं असलं तिनं सोसू बया ! अवं असा प्रसंग आला तिला आपलं दुक सांगायला कुत्रं सुदा

*सीतामाय बाळातीन तिला बाळूत्याची वान।*
*लवकुश बाळावरी झाकली पळसाची पानं ।।*

अशी ही काट्याकुट्यांत जन्मलेली लेकरं काट्या कुट्यासारखीच निब्बारडक्क झाली बगा.

*अनवळ खेळ सीतामाईच्या कारट्याचा।*
*असा त्यांनी चेंडू केला रानच्या सराट्याचा।।*

सीतामाईइतकंच आमाला इठ्ठल रुखमाईचं यॅड बघा.

त्या दोघांचं कवतिक करावं तेवढं कमीच. इठ्ठल भक्ताचे घर पुजायचा अन् बिचारी रुक्मीन हसायची.

*रुसली रुकमीन जावून बसली पानंदी।*
*देवा माझ्या इटलाला चला मन्ती आळंदी।।*

तिचा रुसवा काढण्यासाठी इठ्ठलाला काय खटपट करावी लागली.

*रुसली रुकमीन बसली जावून वाळवंटी।*
*रुसली रुकमीन वाळवंटी दिलं पालं।*

रुक्मिनीचा राग लईच वाईट बगा

*रुसली रुकमीन जशी नागीण तापली।*
*इठ्ठलाच्या मांडीवर तिनं राधिका देखिली ।।*

रुक्मिनीच्या समजूत काढली. रुकमीन वाड्यात आली. तिनं पाची पक्वानाचा गॉडधोड सयपाक केला तर इठ्ठलाला तो फिकाच लागला म्हणून रुकमीन म्हणती,

*रुकमीन जेवू वाढी सोजीची पोळी मऊ।*
*जणीच्या कण्यासाठी देवा आशा नका ठेवू।।*
*रुकमीन जेवू घाली निरशा दुधानं केळं।*
*देवाला आवडलं जणीचं ताक शीळं।*

हे देवाचं आख्ख्यान अख्ख्या जलमात संपायचं नाई. उलीसक भक्ताचं सांगते.

भक्तामंदी देवभक्त तुकाराम महाराज ! पण त्याची बायकू माझ्यासारखीच बघा. देवाजी महाराजाला न्यायला इवाईन पाठीलं. महाराज इवाईनात बसले.

*तुकाराम मनीतेत जिजे इवाईनात बस।*
*घरी पारटी मैस परपंच्याचं होईन कसं ।।*
*तुकाराम महाराज मनीतेत जिजे*
*ईवाईनात बस चल।*
*कुणाचे लेक बाळ जीवाचे होतेन हाल।।*

अखेर शेवट जिजाबाई नाहीच बसली इवाईनात,

*वैकुंठाच्या वाट सांडली बुक्का जाई।*
*तुका गेले वैकुंठी राही एकटी जिजाई।।*

लगीन झालं की लेकीच्या जातीला नव्या घरात जावंच लागतं. तया परतेक आई आपल्या लेकीला सासरी कसं वागावं ते परूपरीनं समजून सांगत असती. एखादीचा नवरा रागीट असेल तर आई सबुरीचा सल्ला देते.

*तापला भरतार जसा पेटाडीचा नाग।*
*नेनते मैने माझ्या, त्याच्या मर्जीत वाग।*

आणि रुसला तर त्याला मोहनी कशी घालावीत आईच सांगती.

लगीन झालं तरी भावावरचा हक्क सुटत नाही. भाऊबीजीला त्याच्याकडून भांडून-तंडून चवाळणी घेतल्याबिगर सोडीत नाही आमी.

*भाऊबीजीच्या दिशी मागत नाई काई।*
*हंड्या, घंगाळं पाच गामी नंदीसकट गाडी दमाई।।*

बहिणीच्या हौसापोटी भावाचं दिवाळं निगतं,

*दिवाळीबाईनी दिवाळं काढलं।*
*सोयीच्या बंधवान उंची खणाळं फाढलं।।*

अश्या या वव्या; आमच्या सुकादुखातल्या मैतरणी. सदाकदा सात संगत करत्यात त्या वव्या. आम्हा सासुरवासणिसी बोलत्यात, माहेरला घेवून जात्यात, देवाची भेट करत्यात. गाताना



आमी आमाला विसरून जातो. एकदा गायला लागलं की, उरीपोटी भरून येत्यात, किती गावा अन् किती नाही असं होतं. समदा जीव फुलून येतो पर ह्या येळाला इतक्या बख्खळ झाल्या.

व्यवगायवगानं झाली भेट तर पुन्हा कवा?

* * *

## मन:पूर्वक कृतज्ञता

गेल्या तीन–चार वर्षांमध्ये महाराष्ट्रात अनेक ठिकाणी छात्र प्रबोधनचे काम वाढत आहे. या विस्ताराचे बहुतांश श्रेय आपल्या स्थानिक कार्यालये सांभाळणाऱ्या केंद्रप्रमुखांना आहे. स्वत:चा व्यवसाय, नोकरी, अन्य जबाबदाऱ्या यातील अनेक व्याप सांभाळत असताना, विद्यार्थ्यांसाठी काहीतरी केलं पाहिजे. सामाजिक कार्यातील आपला वाटा आपण उचलला पाहिजे या भूमिकेतून निस्वार्थीपणे व स्वयंसेवी वृत्तीने, कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता, प्रसंगी स्वत:च्या पदरचे पैसे खर्च करून हे सर्व केंद्रप्रमुख आनंदाने छात्र प्रबोधनचे कार्य करत असतात. म्हणूनच अनेकांपर्यंत छात्र प्रबोधन व त्याद्वारा विविध उपक्रम पोहोचू शकत आहेत. या सर्वांबद्दल केंदप्रमुखांना मनापासून कृतज्ञतापूर्वक अभिवादन!

ज्ञान प्रबोधिनीने चालविलेल्या सर्वांगीण विकसनाच्या चळवळीची मुहूर्तमेढ त्या त्या गावांमध्ये या केंद्रप्रमुखांनी केली आहे. अत्यंत समर्थपणे ते अनेकांना बरोबर घेऊन ही चळवळ आपल्या गावामध्ये रुजवतील असा विश्वास वाटतो. छात्र प्रबोधनच्या अनेक पालकांनीही या चळवळीमध्ये योगदान द्यावे ही अपेक्षा!



*रात्र गुपचूप कळ्या फुलवते आणि तिचे श्रेय मात्र दिवसाला घेऊ देते.*


# असे हे गणित

**डॉ. जयंत नारळीकर**

एका राजाने आपल्या राज्यातल्या शेतकऱ्यांची परीक्षा घेतली. दर एकरी सर्वात जास्त पीक काढणारे तीन शेतकरी त्यांतून निवडले गेले. पण त्या तिघांत पहिला, दुसरा, तिसरा नंबर लावणे शक्य झाले नाही कारण सर्व निकषांत ते तिघे सारखेच होते. अखेर प्रधानाकडे राजाने विचारणा केली. ''यांच्यात नंबर लावून त्यांना योग्य पारितोषिक कसे द्यावे?''

प्रधान, अर्थातच चतुर होता. त्याने हा प्रश्न असा सोडवला. त्या तिघा शेतकऱ्यांना एकत्र बोलवून त्याने सांगितले,

''तुमच्या कौशल्याबद्दल राजेसाहेब तुम्हाला जमीन देऊ इच्छितात. तुम्ही सर्व चाचण्यांत सारखे यशस्वी झालात तेव्हा तुम्हाला प्रत्येकाला एक किलोमीटर परीघाचा भूखंड मिळेल, खास शाही इस्टेटीतून. भूखंडाचा आकार तुम्ही प्रत्येकाने स्वत: निवडायचा.''




## सर्वात हुशार शेतकरी

शेतकरी खूष झाले. राजाच्या तलाठ्याबरोबर जाऊन त्यांनी आपल्या मनाप्रमाणे भूखंडाचे आकार निवडले. एकाने निवडला समभुज त्रिकोण, दुसऱ्याने चौरस, तर तिसऱ्याने वर्तुळ.

''यातून काय निष्पन्न झाले?'' राजाने विचारले, ''तिघांना सारख्याच परीघाचे भूखंड देऊन तू काय साधलेस?''

''महाराज! परीघ सारखा असला तरी भूखंडाचे क्षेत्रफल सारखे नव्हते. मी तुम्हाला हिशेब करून दाखवतो. तुम्हीच पाहाल सर्वात हुषार शेतकऱ्याने सर्वात जास्त भूखंड मिळवला.'' असे म्हणून प्रधानाने खालील गणित मांडले.

१) त्रिकोण ABC मध्ये AD हा BC वर टाकलेला लंब

$AB = \frac{1}{3}$ कि.मी.

$BD = \frac{1}{6}$ कि.मी.

$AD = \sqrt{\frac{1}{9} - \frac{1}{36}}$ कि.मी.

$= \frac{\sqrt{3}}{6}$ कि.मी.

त्रिकोणाचे क्षेत्रफळ

$= \frac{1}{2} \times BC \times AD$ वर्ग कि .मी.

$\frac{\sqrt{3}}{36}$ वर्ग कि .मी.

२) चौरस ABCD ची प्रत्येक बाजू

$= \frac{1}{4}$ कि.मी.

चौरसाचे क्षेत्रफळ = $\frac{1}{16}$ वर्ग. कि.मी.

३) वर्तुळाची त्रिज्या OA

$= \frac{1}{2\Pi}$ कि.मी.

वर्तुळाचे क्षेत्रफळ

$= \Pi \times \left(\frac{1}{2\Pi}\right)^2$ वर्ग कि.मी.


$= \frac{1}{4\Pi}$ वर्ग कि.मी.

प्रधानांच्या चातुर्यामुळे तीनही शेतकऱ्यांचे नंबर लागून त्यांना त्याप्रमाणे पारितोषिक मिळाले. तुम्ही वरील गणित पूर्ण करून ठरवा कोण पहिला आला.

_Y meng$Mr moir

वरील उदाहरण गणिताच्या एका नियमाचे प्रात्यक्षिक आहे. ठराविक परीघाच्या सर्व आकृतीत वर्तुळाचे क्षेत्रफळ सर्वात जास्त.

त्याचप्रमाणे, समान परीघाच्या सर्व त्रिकोणात समभुज त्रिकोणाचे क्षेत्रफळ सर्वात जास्त आणि चारभुजांच्या आकृतीत चौरसाचे क्षेत्रफळ सर्वात जास्त. त्यापुढे जाऊन पाच, सहा, सात... समान बाहुंच्या त्याच परीघाच्या आकृतींचे क्षेत्रफळ वाढत्या क्रमाने असते.... आणि वर्तुळ ह्या क्रमात सर्वात वर !



आपण ह्याच नियमाने स्वस्तात स्वस्त घर बांधायला गेलो तर त्याच क्षेत्रफळासाठी भिंतीवरचा खर्च वर्तुळाकृती घरात सर्वात कमी. पण हा आकार सोयीचा पडत नाही कारण आतल्या खोल्या वर्तुळाकृती असू शकत नाहीत.

समजा आपण ‘स्वस्तात स्वस्त’ हा निकष पाळून एकाच आकृतीच्या एकमेकांना चिकटलेल्या खोल्या असलेले घर बांधायला गेलो तर आपल्यापुढे तीनच पर्याय आहेत; समभुज त्रिकोण; चौरस आणि सुसमषट्कोन, त्यांतल्या त्यांत षट्कोनाचा पर्याय सर्वात उजवा. आपण सामान्यपणे मधला पर्याय वापरतो पण त्यांतही आपल्या खोल्या वर्गाकार नसतात. शेतकऱ्यांची शेते ही आयताकार, पण चौरस नसतात.

पण निसर्गात शेवटचा षट्कोनाचा पर्याय वापरलेला आढळतो. मधमाशांची पोळी षट्कोनाकार कोषांनी व्याप्त असतात.

म्हणजे मधमाशांनी हे गणित योग्य प्रकारे सोडवून मानवावर मात केली नाही का?

* * *

# माळरान फुलवू या

**यमाजी मालकर, पुणे**

ठरल्याप्रमाणे त्यांनी पहाटेच गुरं सोडली. उन्हाळ्याचे दिवस असल्यानं त्यांना तहान लागली होती. त्यांचे पाय आपोआप हाळाकडं वळले. हाळावर पाच मिनिटं तरी गुरं गटागटा पाणी पित होती. पाणी पिल्यावर त्यांना चांगलीच हुशारी आली आणि त्यांचे पाय रानाकडं वळले. गावातले असे सहा-सात कळप सकाळच्याच वेळी हाळावर यायचे आणि पाणी पिऊन रानाकडं चालू लागायचे. आता गावाजवळ कुठंच चरायला राहिलं नव्हतं. त्यामुळं गावाच्या शिवारापलीकडं जावं लागायचं. अर्धा-एक घंटा चालत गेल्यावर एक ओढा लागायचा. तिथं अजून शेतीबाडी व्हायची होती. पावसाळ्याचं पाणी तिथं बरेच दिवस राहायचं. त्यामुळे तर चांगलं गवत वाढायचं.

गावाजवळच हिरवं मिळायचं तोवर इकडं कोणी फिरकायचं नाही. पण आता सारे गुराखी सकाळीच ओढ्याच्या दिशेनं निघतात. आपली गुरं आधी पोहोचतील आणि उरलं सुरलं गवत त्यांना कुरतडायला मिळंल, असं प्रत्येकाला वाटायचं. चैत्रापर्यंत असं चाललं खरं. पण चैत्राच्या शेवटाला ओढ्यावरचं गवतही पार संपलं. गुरांना त्या ओढ्यावर नेलं की ती नुसतीच उभी राहायची. खाली मान काही घालायची नाहीत. कसे घालतील? अहो खाली कुरतडायला गवत शिल्लक राहिलं नव्हतं. काहीच खायला मिळंना तेव्हा गुरं झाडाझुडपांनाच कुरतडायला लागली. एक दिवस त्याचीही पानंफुलं संपली आणि अख्खा ओढा कसा उदास, भकास वाटायला लागला. गुराख्यांना थांबायला सावली पण राहिली नाही. असं किती दिवस चालणार? हळूहळू ओढ्याचा गुरांचा रस्ताही बंद झाला आणि गुराखी चार कोस लांब म्हणजे नदीच्या काठावर जायला लागले. नदीला पाणी नव्हतंच. कुठंतरी हिरवं बेट दिसायचं तेवढंच. त्यावर गुरांनी ताव मारला. ती बेटंही हळूहळू संपली. जनावरांची पोटं काही भरेना. मग गावातली जनावरंच हळूहळू कमी व्हायला लागली. हाळावर जनावरांना प्यायला पाणी नाही, रानात चरायला नाही. गावाच्या शिवारातील चार-दोन विहिरी सोडल्या तर प्यायला पाणी नाही. त्यामुळं सपनातल्या गावासारखा गाव, पण आता हिरवे मळे कुठं दिसेनासे झाले. पुढे तर गावाला प्यायलाही पाणी मिळेना, मग गुराढोरांचे लांबच. लोक त्यांना विकतील नाहीतर काय करतील ?

म्हणता म्हणता अशी वेळ आली की दुभदुभत्यानं म्हणवणारं गाव; पण पाणी

आणि दुधाचा विचार केला तर कोरडं ठणठणीत झालं. तालुक्यात सर्वात जास्त गुरं याच गावात आहेत आणि मुंबईला याच गावातून थेट दूध जातं, असं अभिमानानं म्हणणारे लोक आता आतापर्यंत होते. पण



आता असं कोणीच म्हणत नाही. कारण तसं काही गावात राहिलंच नाही. गावाची रयाच गेली म्हणा ना.

गावकऱ्यांनी या परिस्थितीवर खूप विचार केला, की 'आताच असं का व्हायला लागलं असंल?' सगळ्यांनी खूप डोकी खाजवली पण उत्तर काही सापडेना.

एक दिवस अशीच सभा सुरू होती. विषय तोच पिक-पाण्याचा, गावकऱ्यांनी नेहमीप्रमाणं चिंता व्यक्त केली. गावकरी त्या वर्षी जरा जास्तच चिंतेत होते. कारण त्या वर्षी पाऊसच कमी पडला होता. विहिरीचं पाणी तर जेमतेमच वाढलं होतं.

पिकांची स्थिती पण तशी फार चांगली नव्हती. पिकांचं एकवेळ धकेल. पण पिण्याच्या पाण्याची स्थिती फारच खराब बनणार, याविषयी सगळ्यांचं एकमत होतं. कमी पावसामुळे यंदा गवतही मिळंल की नाही, याची खात्री नव्हती. सगळ्यांसमोर एकच प्रश्न होता. आता करायचं काय?

या प्रश्नावर मात कशी करायची? यावर्षी पण गुरं गावाबाहेर विकली गेली तर गावात गुरंढोरंच राहणार नाही, अशीच स्थिती निर्माण झाली होती. मग गावात राहायचं तरी कसं? गुरांवर गुजराण करणाऱ्या गावकऱ्यांच्या पोटात या विचारानेच गोळा आला होता.

सभेत याची काळजी सुरू असतानाच एक म्हातारबुवा म्हणाले, ''पोरांनो, दहा वर्षांपूर्वी या गावात गुरंढोरं आणि माणसं किती होती, हे आधी सांगा.'' आकडेवारीत हुशार असलेल्या एकानं सांगितलं – ''माणसं होती पाचशे आणि गुरं होती एक हजार.'' म्हातारबुवा म्हणाले, ''आताची आकडेवारी सांगा बरं.'' ''माणसं एक हजार आणि गुरं चार हजार !'' त्यांनी उत्तर दिले. ''दहा वर्षात जमीन वाढली का ?'' ''नाही'' ''पाणी वाढलं का ?'' ''नाही.'' ''जमीन तेवढीच, पाणी तेवढंच. आणि माणसं आणि गुरंढोरं मात्र दुप्पट–चौपट वाढली. मग कसं काय बरं पुरणार सगळं ?'' म्हातारबुवाच्या प्रश्नाने सगळे गप्प झाले. ते म्हणतात ते कळलं तर होतं. पण मग करायचं काय, हे मात्र वळत नव्हतं. त्याच जमिनीच्या तुकड्यावर १० वर्षात एवढा भार वाढला, याचा विचार गावकऱ्यांच्या मनात पहिल्यांदाच शिरला होता. पण त्यावर उपाय काय, हे मात्र त्यांना काही केल्या सुचत नव्हतं. कोणी म्हटलं – ''लोकसंख्येची वाढ रोखली पाहिजे.'' कोणी म्हणालं की ''आता गुरंढोरं पाळण्याचे दिवस विसरले पाहिजे.''

म्हातारबुवा म्हणाले, ''अरे थांबा, थांबा. असं घाईनं काही ठरवू नका. आणखी थोडा विचार करा. नाहीच सापडलं उत्तर; तर मी सांगतोय.''

कोणालाच काही सुचेना म्हटल्यावर म्हातारबुवांनीच सुरुवात केली. ''माणसांची आणि गुराढोरांची संख्या वाढतच गेली. त्याचं काही नियोजन झालं नाही बघा. आला माणूस, राहिला गावात. आणली गुरं, सोडली रानात, पण त्याच्या परिणामांचा विचार कोणीच केला नाही, की त्याला पाणी लागणार, अन्न लागणार. संख्या वाढवायची तर अन्नपाणी पण वाढविलं पाहिजे. पण तसं काही झालं नाही आणि आता ही वेळ आली. ना अन्न–ना पाणी, शेतीला पाणी वापरलं पण हे पाणी कायम टिकेल याच्यासाठी आपण काय केलं? खायला अन्न मिळालं–पण त्याचं उत्पादन वाढत्या लोकसंख्येबरोबर कुठे वाढलं? गुरांना गवत आहे तोवर गुरं चारली, पण पुढे ती विकावी लागली, त्याचं काय?'' म्हातारबुवाचं म्हणणं सगळ्यांना पटलं, पण सगळ्यांचं म्हणणं होतं की मुद्दा लक्षात आला; ''आता यापुढे काही करता येईल का ? तर ते सांगा.''

आणि म्हातारबुवा पुढे बोलू लागले, ''गुरा-ढोरांना खाण्यापिण्याची शिस्त नाही; तशीच ती आम्हा गावकऱ्यांनही नाही, असंच आता म्हणणं भाग आहे. अहो, आपल्या घरात आपण खाण्यापिण्याचं नियोजन करतो की नाही ? मग तसं गावाचं नियोजन का नाही करायचं ? आज एखाद दुसऱ्याच्या विहिरीलाच पाणी आहे. पण सगळ्यांच्याच विहिरींना पाणी येण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे. ओढ्यावर गवत वाढण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे. याच्यासाठी हवं नियोजन. आख्ख्या गावाचं नियोजन. ते करण्याची तुमची तयारी आहे का? बोला.'' ''तयारी आहे'' असा सभेतून आवाज आला आणि म्हातारबुवांना चांगलाच हुरूप आला.

म्हातारबुवा पुढे सांगू लागले, ''आपल्या गावापासून शंभर कोसावर राळेगण सिद्धी नावाचं गाव आहे. तिथंही काही वर्षांपूर्वी अशीच स्थिती निर्माण झाली होती. अण्णा हजारे नावाचा मोठा माणूस तेथे आला. त्यानं गावाची ही वाईट अवस्था पाहिली. तो स्वत: तर कामाला लागलाच पण हळूहळू त्यानं सगळ्या गावाला कामाला लावलं. मी एका सोयरीकीसाठी म्हणून राळेगण-सिद्धीला गेल्या वर्षी जाऊन आलो. जादूच केली हो त्या माणसानं. गाव अन् गावाचा शिवार कसा हिरवागार! अगदी वैशाखाच्या उन्हात पण गावाच्या विहिरींना पाणी! रानंही अधूनमधून हिरवी. ओढ्यावर दाट झाडंझुडपं. हे असं कसं, अशी चौकशी केली पाव्हण्याकडं, तेव्हा समजली अण्णा हजारेंची थोरवी. याला म्हणतात, बघा गावाचं नियोजन! अहो, सगळ्यांनी एकत्र राहायचं गावात, मग गावाचं नियोजन करायला काय हरकत आहे म्हणतो? घराच्या भिंतींनं घरं उभं राहतात. पण घराबाहेर निघाले की सगळेच गावकरी. त्यांनी गावाचा विचार केला पाहिजे. म्हणजे आपोआपच घराला बरकत येते, हे राळेगण-सिद्धीमध्ये म्या पाहिलं बघा. ते पाहूनच चाट पडलो. काय केलं सांगू त्यांनी? अहो जमिनीखालचं पाणी काही एकट्या-दुकट्याच्या मालकीचं. गाव आणि शिवाराखाली एक विहीर आहे असं म्हणा फार तर. त्या विहिरीतून जो-तो उपसणार. कधीतरी पाणी संपणारच की नाही? सगळ्यांनी उपसलं आडवंतिडवं पाणी तर विहिरीत कोठून येणार पाणी ?अन् विहिरीत नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ? आपल्या गावाचं तेच झालं बघा. म्हणजे पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाण्याचं नियोजन केलं पाहिजे. गावाच्या 'विहिरी'वर गावाची मालकी. दुसरं महत्त्वाचं त्यांनी काय केलं माहिती आहे? डोंगरदऱ्यांवर,

रानांमध्ये, ओढ्यावर चराई बंदी करून टाकली. म्हणजे गुरं रानात चरायला सोडायची नाही. त्यांना गोठ्यात बसून खाऊ घालायचं. म्हणजे गावाच्या शिवारात झाडंझुडपं वाढतील. गवत माजेल, मग ते कापून जनावरांना द्यायचं. असं बरंच काहीकाही झालंय राळेगण-सिद्धीमध्ये, पण आपल्यापुरते दोन मुद्दे महत्त्वाचे. एक म्हणजे जमिनीखालच्या पाण्याचा साठा वाढला पाहिजे आणि दुसरं म्हणजे चराई बंदी लागू केली पाहिजे. आता हे कसं करायचं, ते मात्र गावानं ठरवायचं.''

म्हातारबुवांचं म्हणणं सभा शांतपणे ऐकत होती. पण ते थांबले म्हटल्यावर सगळे एकमेकांकडे पाहू लागले. ''आपणही तसं करायला काय हरकत आहे?'' एकजण म्हणाला, ''काय हरकत आहे, म्हणजे काय - अहो काहीतरी केलंच पाहिजे. नाहीतर गाव उजाड व्हायला वेळ लागणार नाही.'' दुसरा म्हणाला, ''म्हातारबुवा, तुम्हीच सांगा - आम्ही काय करायचं ते.'' तिसरा म्हणाला. म्हातारबुवा म्हणतात ते सभेला मान्य होतं तर.

पुन्हा म्हातारबुवा बोलायला लागले, ''हे बघा मंडळी, माझ्या मनातलं मी बोललो. आता गावानं पुढाकार घ्यायचा. असं लगेच काही करण्यापेक्षा आपण सगळेच राळेगण-सिद्धी पाहून घ्यावे असं



मला वाटतं. एक दिवसाचा कार्यक्रम. मग असंच बसू परत आणि पक्कं करून टाकू. गाव तर सुधारलंच पाहिजे नाहीतर काही राहणार नाही. या माळरानावर-हे तर सगळ्यांनाच मान्य आहे. मग उशीर कशाला करायला सांगा बरं.'

आणि राळेगण-सिद्धीला जायचं पक्कं झालं. मंडळी एक दिवस राळेगणला जाऊन आली. तिथलं पाणी, तिथली झाडं, तिथली शाळा, गावातली स्वच्छता, पक्के रस्ते पाहून भारावून गेली. प्रत्येकाला आपलंही गाव असंच दिसंल, असं वाटू लागलं. आता आपला पण गाव असाच करायचा असा पक्का निर्णय करून गावकरी गावात परतले. म्हातारबुवा मनातल्या मनात म्हणाले- ''मंडळी, राळेगण-सिद्धीशी सोयरीक जमली म्हणायची. आता संसार सुखाचा होणार, यात काय बी शंका नाय.''

***

# करून तर पाहा - अन्न टिकवण्याचे उपाय

१) गहू – पत्र्याच्या डब्यात तळाला कडूलिंबाचा पाला पसरावा. त्यावर वर्तमानपत्राचा कागद पसरून गहू भरावे. १०० किलो गव्हात १ किलो मीठ मिसळले किंवा प्रत्येक किलोला १ या प्रमाणात पाऱ्याच्या गोळ्या टाकल्या तर गहू खराब होत नाहीत.

२) तांदूळ – तांदूळ उन्हात वाळवू नयेत. तांदुळामध्ये हिंगाचे खडे किंवा मीठ मिसळावे. एरंडेल तेल लावले तरीही तांदुळात कीड होत नाही.

३) डाळी – डाळींना चांगले उन्ह द्यावे. डब्यात भरताना पाऱ्याच्या गोळ्या वापराव्यात.

४) अंडी – उकळते पाणी चुलीवरून खाली उतरावे. या गरम पाण्यात अंडी १ मिनिट बुडवून बाहेर काढावीत. जास्त दिवस टिकतात.

५) भाज्या – उन्हाळ्यात भाज्या लवकर सुकतात. त्यासाठी भाजी रिकाम्या मडक्यात ठेवून ते मडके झाकून पाण्यात ठेवावे. बांबूच्या टोपलीत ओले गोणपाट टाकून त्यावर भाज्या ठेवाव्यात, वर दुसरे आले गोणपाट पसरावे. टोपली अंधार असलेल्या ठिकाणी ठेवावी. भाज्या बऱ्याच वेळ ताज्या राहतात.

६) तूप–तुपात दोन चमचे मीठ किंवा विड्याचे पान टाकून तूप गरम केले तर तुपाचा स्वाद दीर्घकाळ टिकतो.

# ग्रामीण शब्द- तुमचे ज्ञान - योग्य पर्याय शोधा

१) कणगी – (अ) बारीक कण (ब) कणकेचा पदार्थ
(क) धान्य साठवण्याचे चिपाड्याचे पिंप

२) बळद – (अ) बळ देणे (ब) धान्य साठवण्याची भिंतीतील पोकळ जागा (क) बळेच

३) कासरा – (अ) जनावरांना बांधायची दोरी (ब) चुलत सासरा (क) थोडे सरकणे

४) चुंबळ – (अ) उसाचे चिपाड (ब) उचमळणे
(क) डोक्यावर ओझे सहन व्हावे यासाठीचा कपडा

५) मायंदळ – (अ) आईचे देणे (ब) पुष्कळ (क) सैन्याची तुकडी

६) घसट – (अ) मैत्री (ब) घसरणे (क) सरकणे

७) ओशट – (अ) औषध (ब) तेलकट, बुळबुळीत (क) शेटजी

८) अडणी – (अ) भांडी ठेवण्याची तिवई (ब) गावंढळ (क) अडाणी

९) धडोत – (अ) धड नसणे (ब) जाडेभरडे मजबूत कापड

१०) औंदा – (अ) एक प्रकारचा कांदा (ब) ह्या वर्षी (क) विशेष सौदा

उत्तर सूची – १) क २) ब ३) अ ४) क ५) ब ६) अ ७) ब ८) अ ९) ब १०) ब

# डोळस बनू या

**श्री. रामदास सोनार,**
**लोणजे, चाळीसगाव, जि. जळगाव.**

आमच्या आश्रम शाळेचे गाव डोंगर पायथ्याशी. या डोंगरपायथ्याशी १५/२० तांड्यांची वस्ती, यात बरीचशी मंडळी अशिक्षित. तेव्हा अशा परिसरात शाळा चालविणे कठीण. तरीही आमची संस्था यात यशस्वी कार्य करीत आहे. वर्षातून अनेक वेळा येणारा महोत्सव म्हणजे जत्रा. यात सर्व लहान थोर सहभागी होतात. तेव्हा शाळेला दांडी, कितीही पटविले, अडविले तरी पालक मुलांना यात्रेला नेणारच व विद्यार्थी जाणारच. तुम्ही शाळेतून सोडा अगर न सोडा.

यावर मी बऱ्याच दिवसापासून विचार करीत होतो. यातील माहिती मिळवीत होतो. आमचे जाणकार विद्यार्थी, पालक, नागरिक यांच्याशी चर्चा करीत होतो. आश्रमवासी विद्यार्थ्यांना रात्री ८.०० वाजता एकत्र जमविले. यात पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी बरेचसे समजदार व सर्व बंजारा समाजाचीच. त्यावेळी विषय घेतला शंका निरसन, यात सर्वच विद्यार्थी रमलेत. बोलकी झालीत. तेव्हा त्यांना सांगितले, ''तुम्ही मला प्रश्न विचारलेत मी उत्तरे दिलीत. आता मी प्रश्न विचारतो तुम्ही उत्तरे द्या.'' सर्वांनी होकार दिला. ''उत्तरे एक एकाने द्या, प्रश्नांची उत्तरे प्रत्येकाला देता येतील असेच प्रश्न विचारतो.''

''तुम्ही कोण कोणत्या देवाला पुजता ? त्यासाठी तुम्ही काय काय करता?'' तेव्हा बऱ्याच विद्यार्थ्यांनी उत्तरे दिलीत. ''यात्रा भरविली जाते. देवाचा नवस फेडला जातो.'' ''बरं यासाठी कोण कोण येतात ?'' तेव्हा ते म्हणाले, ''आमचे सर्व नातेवाईक, त्यांना मेजवानी म्हणून देवाच्या नवसाचा बोकड खाऊ घालतो.



तसेच दारू, करमणूक म्हणून तमाशा व त्यात आम्ही सर्वच लहान थोर सामील होतो.''

''आपल्या गावात व परिसरात वर्षभरात एकूण २५/३० यात्रा भरतात. तर मग प्रत्येक यात्रेत किती बोकड मारली जातात ?'' ''जवळ जवळ १०० च्या आसपास.'' ''तेव्हा

हे का म्हणून मारली जातात ?'' कुणी आजारी पडला की नवस केला जातो. किंवा काही संकट आले तेव्हाही नवस केला जातो. मग देव प्रसन्न होऊन आजारी व्यक्ती बरी होते. मग यात्रा आली की कबूल केलेला नवस फेडतो. त्यात मग कुणी मिठाई, नारळ, बोकड इत्यादी देवाला अर्पण करतो.''

''तेव्हा तुम्हीही आजारी पडला असाल ? तुमचाही नवस कबूल केलेला असेल ?'' ''हो'' ''कोणाकोणाचे बरे नवस फेडले?'' बऱ्याच मुलांनी वरती हात केला. ''तेव्हा बोकड कापला असेल ?'' ''होय.'' ''का कापला?'' ''देवावर आमची व आमच्या आई-वडिलांची श्रद्धा होती म्हणून नवस फेडला.'' ''नवस नाही फेडला, बोकड नाही कापला, नुसते नारळच फोडले तर ?'' ''देव कोपतो आणि जास्त आजारी पाडतो.''

''बरं नवस फेडायला तुम्ही गेला होता का ? त्यात तुम्हाला काय काय दिसले ?'' ''प्रथम बोकड मिरवून वाजत गाजत देवापुढे उभा केला. मग देवाच्या पुजाऱ्याने मंत्र म्हणून पूजा सांगितली व बोकडाच्या मानेवर सुरी चालवली, देवाला रक्त दिले व खुरीही दिल्या. नातेवाईक मंडळी आनंदाने जेवले. नारळाचा प्रसादही देवाला दिला व आम्हीही तो मजेत खाल्ला. येताना खाऊ शिरणी, खेळणी आणली व शेजारीही शिरणी वाटली. नवसाच्या दिवशी नवे नवे कपडे घातले.



(पान क्रमांक ४० वर पुढे चालू)

# ग्रामीण आरोग्य

डॉ. कौमुदी गोडबोले

शहरी गजबजाटाला बाजूला सारून पावलं कधीकधी अवघड वाटेला लागतात. हिरव्यागार शेतातल्या वळणावळणांच्या पाऊलवाटा, खडखडणारी बैलगाडी, नदीनाले, गाई-गुरं, पोरं-टोरं नजरेत यायला लागतात. पारावरची बैठक, शेतातला नांगरधारी, पाण्याला निघालेल्या बायका आणि ह्या साऱ्यांना वर्षानुवर्ष साक्ष असणारे झाडाझाडांखालचे दगडांचे देव! घड्याळाच्या तालावर, नोकरीधंद्यातच रमणाऱ्या शहरी मनाला इथला निवांतपणा चटकन जाणवतो, मन सुखावतंही ! आणि विचार करता करता हळूहळू ग्रामीण जीवनातलं वास्तव सामोरं येतं.

आता आरोग्यविषयक बघायचं झालं, तर शहरात मोठीमोठी इस्पितळं, तपासणी केंद्र, खाजगी दवाखाने याचं पेवच फुटलेलं असतं. रुग्णवाहिकांचा ताफा, नवनवीन यंत्रसामुग्री दिमतीला असते आणि खेड्यात? गावाच्या गर्दीत चेहरा हरवलेलं एखादं प्राथमिक आरोग्यकेंद्र किंवा त्याची उपशाखा-जिथे वेळेवर डॉक्टर आणि औषधं मिळणं भाग्याचंच ! डॉक्टराइतकेच कधीकधी जास्तच महत्त्वाचे वैदू, हकीम, मांत्रिक-तांत्रिक! धक्के सोसत बैलगाडीतनं जाणारी अडलेली बाळंतीण किंवा एस.टी. च्या थांब्यावर खोळंबलेला कण्हणारा रुग्ण ! कधी कधी तर पाणी आडवं आलेलं आणि पावसाळ्यात नावेची वाहतूक नाही म्हणून खेडंच्याखेडं रोगराईनं गिळलं! खेड्यातला माणूस आणि शहरातला माणूस, इतका फरक असावा त्यांच्या जगण्यात? दोघंही रक्ताचे, हाडामांसाचेच बनलेले पण त्यांच्या अडचणी आणि त्यांचे इलाज मात्र इतके वेगळे?

अर्थात हा आरोग्याचा प्रश्न इथेच संपत नाही बरं, तो तर सर्वव्यापी आहे. गरिबी, अन्नाची कमतरता, अडाणी निरक्षर जनता, अंधश्रद्धांचा पगडा, जुनाट अपायकारक चालीरीती हे तर त्याचं मूळ आहे आणि त्याच्या जोडीला अपुरं, अस्वच्छ पिण्याचं पाणी, अस्वच्छतेचे पसरलेले साम्राज्य, उघडी गटारगंगा आणि दळणवळण, औषधं यांची कमतरता या सगळ्यांची भक्कम साखळी जबाबदार आहे या स्थितीला!

खेड्यातल्या दवाखान्यात लहान मुलांचे मुख्य आजार कुठले ? तर हगवण, श्वसनाचे विकार, कातडीचे आजार ही मंडळी किरकिरणाऱ्या किडकिडीत पोराबाळांमध्ये वस्तीला आलेली. हे कमी की काय म्हणून नित्यनेमाने येणारे वेगवेगळ्या साथींचे आजार! अस्वच्छ पाणी, उघड्यावर शौचाला जाणं आणि उघडी गटारं यांच्यामुळे रोगजंतूंचं फावतं आणि हगवणीसारखा आजार होतो. बाळाला केवळ अज्ञानामुळे उपाशी ठेवल्याने तो अधिकच बळावतो. पिण्याच्या पाण्याचे हाल असताना स्वच्छ अंघोळ कुठून करणार? अधूनमधून रोडावलेल्या नदीतल्या किंवा पालापाचोळा साठलेल्या विहिरीत डुबक्या, खरूज, नायटा गळवं हे त्यामुळे रोजचंच !

साठलेल्या अस्वच्छ पाण्यात कचऱ्या-झाडोऱ्यात तर डासांचं वसतिस्थान ! उघड्या पदार्थावर झुंडीच्याझुंडींनी घोंघावणाऱ्या माशांच्या संगतीला डासांची पलटण मलेरिआसारखे आजार पसरवण्यात आघाडीवर असते. ह्या साऱ्यांचा परिणाम म्हणजे पाठ-पोट एक झालेली, भप्प, भोपळ्यासारखी सुजलेली किंवा केवळ हाडं न् कातडी झालेली अशक्त थकलेली मुलं दिसतात. पुरेसं आणि योग्य ते अन्न न मिळणं ही तर आपल्या शेतीप्रधान देशाची महत्त्वाची समस्या-त्यातून निर्माण होणाऱ्या विविध कमतरता. कोणाला आयोडीन कमी म्हणून गळ्यावर सुजलेला गालगंड तर कोणाला लोह कमी म्हणून पंडुरोग, थकवा आणि मंदपणा. 'अ' जीवनसत्त्व कमी पडल्यामुळे कोणाला रातांधळेपणा तर कोणाला 'ड' जीवनसत्त्व न मिळाल्याने हातापायांच्या काड्या आणि पोटाचा नगारा ! काही आजार अगदी वेगळे, शहरातल्या लोकांच्या वाट्याला न जाणारे-सर्पदंश, विंचूदंश आणि कधी कधी जंतूनाशकं पोटात गेल्यामुळे होणारे अगदी प्राणघातक आजार.

खरं तर अशाप्रकारचे बरेच आजार शहरातही होतात, पण खेड्यात मात्र ते जीवघेणे का ठरतात? घरची परिस्थिती, अज्ञान, अंधश्रद्धा यांवर मात करून आजाऱ्याला डॉक्टरी उपाय मिळण्यातच खूप वेळ जातो. अगदी टोकाला गेलेला, जीवनमरणाच्या सीमेवरचा रुग्ण घेऊन मंडळी शहरात येतात. तिथला दिखाऊ चकचकाट, अगम्य तपासण्या, राहण्याखाण्याची गैरसोय यांना बिचकून काही रुग्ण खेड्यात परतणंच पसंत करतात. गंडेदोरे, डागणं, बिब्बा घालणं अशा निरर्थक, खूपदा अपायकारक 'उपायांना' बळी पडतात.

किती विदारक आहे हे चित्र ! एकीकडे हृदयाचं रोपण (Heart Transplant) करणाऱ्या भारतात हगवण, श्वसनाचे विकार, साथीचे आजार यामुळे हजारो बालक दगावतात. हे सारं प्रयत्न केले तर नक्कीच टाळण्यासारखं आहे. सकस, समतोल आहार, लसीकरण, प्रथमोपचार यांचं महत्त्व घरोघरी कळलं पाहिजे. निरोगी जगायला शिकवणारं शिक्षण आपल्या शाळांमधून आवर्जून मिळायला पाहिजे. व्यसनांच्या विळख्यातून मुक्त होऊन अंधश्रद्धांचा अडसर दूर करून योग्यवेळी योग्य उपचार करायला हवेत. गावागावात बांधलेले संडास, बंद गटारं, नळांद्वारे पाणीपुरवठा, पाण्याचं निर्जंतुकीकरण ह्या सुधारणा आवश्यक आहेत.

आर्थिक विषमता, राजकीय आणि सामाजिक परिस्थिती बदलणं फारच कठीण काम आहे पण आपण निदान आपला खारीचा वाटा उचलायला नको? आपल्याला जे जे उपयुक्त ज्ञान आहे ते इतरांना देण्याचा प्रयत्न नक्कीच करता येईल. चला तर, जेव्हा आणि जिथे संधी मिळेल तिथे आपण स्वत:च आरोग्यसेवक बनूया. आरोग्याचा वसा न उतता, न मातता शहरी मित्रांबरोबर खेड्या-पाड्यांतल्या सवंगड्यांना देऊ या !

***

# जळावीण जीवन कसले ?

**श्री. माधव देशपांडे**
खेड शिवापूर जि. पुणे



वाडीच्या पारावर मंडळी हळूहळू जमू लागली. हरबा आला, नामू आला, इंदूआक्का आली, सरपंचाला सांगावा गेला. तुकानाना बगुनाना सावरून बसले. मंदाईवैनी आल्या. ''कारं, हरबा, काय गडबड हाय ?'' तुकानाना म्हणाले. ''अगं, अवंदा पाणी कमी झाले तवा काळजी घ्यायला हवी, आता उन्हाळा आला. पाण्यासाठी कुठंकुठं जावं ?'' गणपा म्हणाला, ''अरं काय, मागच्या साली पंचायतीनं तो पंप नाही का लावला त्याचं कुठवर आलं?''

सरपंच, आबा पाटील आले तशी सारी मंडळी सावरून बसली. जोशी गुरुजी लगोलग आले. ''या या पाटील बसा.'' नामूने ग्रामसेवक आला नाही म्हणून तक्रार केली. ''बरं बरं!'' आबा म्हणाले ''गुरुजी, म्होरं या.'' ''आलो आलो.'' भागाबाई म्हणाल्या, ''सरपंच, अहो तो आमच्या आळीतील हातपंप चालंना बघा. पाण्यासाठी डोईवर हंडा घेऊन पार लांब जावं लागतं. खरं हाय ना कंसाबाई ?'' ''हा ना ! मी तेच म्हणणार होते पण बरं झालं त विषय काढला.''

''बरं, बरं, आलं ध्यान्यात. ग्रामसेवक आले नाय म्हणून काही बिघडत नाय.'' आबा म्हणाले, ''पंप आपल्या गावचा आहे. आपण बघू काय करायचे ते. खरं हाय ना गुरुजी ?'' ''बरोबर आहे, आपण जर योग्य काळजी घेतली तर हातपंप बिघडत नाही.'' ''अहो, पाणी म्हणजे जीवन आणि आपल्याला जर मंडळी चांगले आरोग्य हवे असेल तर हातपंपाचे पाणी प्यावं.''

हणम्या म्हणाला, ''अवं गुरुजी, तुमचे म्हणणे खरे हाय, पर ह्या टायमाला पंप बंद

आहे तवा गावानं काय करावं ?''

''खरं हाय, खरं हाय,'' रामभाऊ म्हणाले, ''सरपंच, आपणच काहीतरी हालचाल केली पाहिजे, पर गुरुजी जे म्हणाले ते बी समजून घेतलं पाहिजे.'' आबा पाटील म्हणाले, ''गुरुजी, तुम्ही शिकली सवरलेली जाणती माणसं, तवा काय ते उलगडून सांगा. म्हणजी आपण काळजी घेऊ.''

शिरपा ओरडला, ''अरं तो पोरांचा कालवा कमी करा. ऐकारे गड्यानो, गुरुजी काय सांगतात ते.'' जोशी गुरुजींनी डोक्यावरची टोपी सरळ केली. कोटाची बटणे नीट लावली व उभे राहिले. ''तर मंडळी, मी तुम्हाला मघाशी म्हणालो, अहो पाणी म्हणजे जीवन आणि आपल्याला प्यायला पाणी मिळवून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. तरीसुद्धा आपली पण काही कर्तव्ये आहेत. उघड्यावरचे ओढे, नाले, तलाव, नद्या यांचे पाणी प्यायले तर आजारपण येतं व आपलं आरोग्य बिघडतं कारण ते म्हणावं एवढे शुद्ध नसतं. यासाठी १९७०–७१ च्या दुष्काळापासून आपल्या शासनाने गावोगावी सर्वेक्षण करून भूजल सर्वेक्षण विभागामार्फत जमिनीच्या पोटातील पाणी हे विंधन विहिरीद्वारा लोकांना उपलब्ध करून दिले. जमिनीच्या पोटातील पाणी हे हातपंपाद्वारे जर आपण पिण्यासाठी वापरू लागलो तर ते शुद्ध पाणी प्यायल्याने आजारपण येत नाही. शासनाची घोषणाच आहे. 'हातपंपाचे पाणी आरोग्याची हमी' आपल्या महाराष्ट्रातील शासनाच्या ह्या विभागामार्फत बहुसंख्य ग्रामीण भागातून हातपंप बसवले गेले आहेत.'' नारबा म्हणाला, ''अवो गुरुजी, पण ते बंद पडतात त्याचे काय ?''

''अरे हो, तेच सांगतोय, आपल्या वाडीत पंप बसवून किती दिवस झालेत ?''

शिरपा म्हणाला, ''झालं एक साल.''

गुरुजी ''आज त्याची अवस्था काय आहे हे कोणी पाहिलं ?''

गंगुताई म्हणाल्या, ''पंप लई झाक झालाय. पाणी ओढायला जड जातं.''

''बरं'' गुरुजी.

सोपान–''अवं गुरुजी पंपाभोवती मायंदळ घाण झालीय.''

रघू म्हणाला, ''काय राव, काय सांगताय डबकं झालंय तिचं डबकं.''

आबा पाटील म्हणाले, ''अरं, अजून गुरुजींना बोलायंच आहे त्यांचं पुरं होऊ दे मग बघू. बोला गुरुजी !'' ''आणि जरा उरकतं घ्या. लोकांना धारा काढायची घाई झालीयं.'' असे बन्याबापू म्हणाला.

''मी तेच सांगतोय. आपण आधी काय झालंय ते समजून घेऊ. ज्यावेळी आपल्याकडे हातपंप बसवला तेव्हा झालेली बैठक आठवतेय का? प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी आपल्याला

काय सांगितले होते. पंपाची काळजी कशी घ्यावी ते ? आपण करत नाही आणि आता पाणी कमी झालं म्हणून धावपळ करतोय. ती योजना नीट समजून घ्या.

हातपंप ज्या ठिकाणी उभारला आहे त्या पंपाच्या परिसरात ५ मीटरच्या आत पाणी साचू देऊ नये. हातपंपावर कपडे, जनावरे धुवू नयेत, भांडी घासू नयेत, गुराढोरांना पाणी पाजू नये. सांडपाण्याचा नीट निचरा करावा. त्यासाठी खड्डा उभारावा. हातपंपाचा प्लॅटफॉर्म हा फुटू देऊ नये. पंपाचा सगळा परिसर स्वच्छ राहिल याची काळजी घ्यावी.''



''पर गुरुजी, ते हँडल जाम झालंय त्याचं काय ?'' असे गंगूवैनी म्हणाली.

''मी तेच सांगतोय, आपण काय काळजी घेऊ शकू ? हातपंपाचे हँडल पूर्ण चाल देऊन वापरावे. हातपंपाच्या चेनला वंगण किंवा ग्रीस नियमितपणे लावावे. हातपंपाचे नट बोल्टस् हे पक्के आवळलेले असावेत. महत्त्वाचे म्हणजे हा पंप जरी शासनाने आपल्या गावाला दिला असला तरी, गावाने तो आपल्या मालकीचा आहे असे मानून मालकीहक्काने वापरावा व त्याचे रक्षण करावे.

पंपाची योग्य काळजी जर घेतली तर ती नादुरुस्त होत नाही.

''मला वाटतं सरपंच या निमित्ताने जर सारी मंडळी एकत्र आलो आहोत आपली एक पाणीसमिती का असू नये? मागच्या वेळेला या पाणी समितीचे महत्त्व आपल्याला प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी समजावून सांगितले होते.''

बगुनाना म्हणाले, ''तुमचं म्हणणं खरं हाय गुरुजी! पाणी–समिती ठरवून टाकू या टायमाला.'' सोपान म्हणाला, ''अरं आपल्या गावाला ते काय पंप दुरुस्ती किट मिळाली आहे, खरं ना सरपंच ?''

''हो, आलीय.'' ''मग गुरुजी तुम्ही तालुक्याला जाऊन साहेबाला घेऊन या. आपून आपल्या गावात हा पंप कसा काय दुरुस्त करता येईल, ते बी शिकून घेऊ.'' हरबा म्हणाला.

गडी काय नेमका बोलला म्हणून सोनबाने टाळी दिली. गुरुजींनी गावपातळीवर पंप दुरुस्ती करण्यासाठी

योजना तयार केली आणि गुरुजी म्हणाले, ‘‘तालुक्याला शिकायला गेलेली पोरं सुट्टीत आता येतीलच की. त्यांच्याकडून आपण हे काम करून घेऊ शकतो. त्यांच्याही ज्ञानात भर पडेल व सार्वजनिक काम केल्याचा आनंद मिळेल खरं ना रघू ?’’

‘‘सर्वांनी सहकार्य करायचं बरं का !’’ असे म्हणत आबांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

***

## डोळस बनू या

(पान क्रमांक ३४ वरून पुढे चालू)

खूप खूप मौज केली. असे वाटते रोजच जत्रा यावी.’’

नंतर विचारले, ‘‘नवस दिल्यानंतर तुम्ही दुसऱ्या दिवशी मंदिराकडे गेले का ?’’ ‘‘हो गेलो होतो.’’ ‘‘तेथे काय काय दिसले ?’’ ‘‘आजूबाजूला त्या परिसरात खाऊचे कागद, देवाजवळ नारळाच्या शेंड्या, मंदिरापुढे रक्ताचा सडा, त्यावर कुत्रे व माश्यांची गर्दी सारे कसे अस्वच्छ.’’

‘‘बरे दुसरे असे की आपण आजारी पडल्यामुळे किंवा आपल्यावरील संकट निवारल्यामुळे व आपला त्रास दूर होण्यासाठी आपण देवाला बोकड कबूल केला. त्याप्रमाणे नवसही फेडला. तेव्हा बोकड कापताना पाहिले का ?’’ ‘‘होय तो ओरडत होता. मग त्याचे पाय धरले. कुणी तोंड दाबले तरी तो सर्व ताकदीने ओरडत होता. त्यांच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होता.’’

‘‘पण मग पुढे काय ? या सर्वांपुढे तो हरला व गतप्राण झाला. तेव्हा मुलांनो, एकाचा जीव वाचविण्यासाठी दुसऱ्याचा जीव घेतला. हे खरंच देवाने मान्य केले असेल का ? देवाने खरोखर हा नवस स्वीकारला हे कोणी पाहिले का ? नाही. तर त्यात काय आहे अंधश्रद्धा. ही चांगली की वाईट ?’’ ‘‘वाईट.’’

‘‘यावर आपण काय करणार ?’’ ‘‘शाळा बुडवून यात्रेला जाणार नाही आणि नवस फेडण्यासाठी बळी देणार नाही. आमच्या पालकांनाही समजावून सांगू की अंधश्रद्धा ही वाईट आहे.’’

त्याप्रमाणे चालू वर्षाच्या यात्रेत खरोखर आमच्या काही विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला. काही अंशी त्यांना यशही आले. बोकड मारण्याची संख्या कमी झाली. अशीच ही अंधश्रद्धा हळूहळू कमी होईल याची मला खात्री आहे.

***




# खेड्याआई
# (यात्रावर्णन)

**अप्पा (दत्ता) नलावडे,**
गुरुकुल, डोमरी, बीड.

डोमरी हे गाव डोंगरच्या द्रोणात बसलेले. नदीच्या कुशीत झोपलेले. गाव तसं रेखीव ऐतिहासिक एक गढी आहे. गावचा रुबाब गढी व काही जुने वाडे. प्रत्येक घरी मातीच्या चुली या म्हणीप्रमाणे गावात राजकारण हे ठरलेलंच, पण पौर्णिमेचा (चैत्रातील) दिवस जवळ येतो. त्या दिवशी सर्वांची मनं एक होतात. हे मन एक करण्याचे काम गाव कोसावर असणारी कृपाछत्रीणी, ममताई, खेड्याई करते.

खेड्या आईचं मंदिर तसं खूपच प्रसन्न. शांत वातावरण. मंद वाऱ्याची झुळूक. लता-वेलींचा सुगंध त्यामुळे देवीच्या भोवतालचे प्रांगण प्रसन्न वाटते. सर्वांची मने फुलवणारा देवीचा उत्सव !

यात्रा जवळ येते आणि मुलाबाळांची, बापड्यांची गडबड उडते. यात्रेचा एक-एक दिवस जवळ येतो. कर्त्या माणसांची चलबिचल उडते. खिशात पैसा जमा होतो. यात्रा जवळ आल्यामुळे संपूर्ण देऊळ रंगवलेले असते. पांढरा रंग उन्हात चमचमतो शुक्राच्या चांदणीसारखा. यात्रेच्या आदल्या दिवशी देवीच्या मंदिरात जागरणाचा कार्यक्रम असतो. गावातील



जाणकार मंडळी डफड्याच्या (हलगीच्या) आवाजाबरोबर चालत मंदिराजवळ येतात. हा दिवस चैत्र पौर्णिमेचा दुसरा दिवस असतो.

गावाची परंपरा जाणणारे, पोथ्या पुराण सांगणारे सर्वांचे काका, माधव काका देवीचा होम पंचक्रोशीत होणार नाही, अशा मंत्रोच्चाराने करतात. रात्रभर विविध कार्यक्रम होतात. जुन्या गीतांचा कार्यक्रम गोंधळ्याकडून साजरा केला जातो.

चैत्र शुद्ध पौर्णिमेचा तिसरा दिवस उजाडतो. घराच्या दारात सुंदर रांगोळ्या दिसतात. सर्वांचे चेहरे ताज्या फुललेल्या फुलाप्रमाणे वाटतात. सर्वांच्या अंगात नव्या वस्त्राची नवी नवलाई दिसते.

यात्रेच्या स्थानावर मिठाईवाल्याची पांढरी पंख पसरलेली पाले उभी राहतात. यात्रेत लोक येण्याची वेळ-दुपारचे ऊन सरल्यानंतर. गावातील प्रतिष्ठित मंडळी, लहान-सहान पोरं गोळा होतात. गावातील बँड वाजत असतो व यात्रेच्या ठिकाणाची म्हणजेच छबिन्याची रंगत चढते, प्रत्येकाचे अंग स्वाभिमानाने फुलते कारण या उत्सवात जातीधर्माला मूठमाती देवून प्रत्येकजण सामील होतो.

देवीच्या दर्शनानंतर यात्रेची शोभा म्हणजे कुस्त्या. कुस्त्याचा फड हात पसरून उभ्या असणाऱ्या वटवृक्षाखाली सुरू होतो. हलगीच्या आवाजाबरोबर डोमरी



पंचक्रोशातील पहिलवानांचे अंग उतू आल्यासारखे होते. कुस्त्याची खरी रंगत चढते. वर्षभर कमवलेल्या शरीराचा प्रत्येक वस्तादाला अभिमान वाटतो. अनेक बक्षिसं वाटली जातात. लहान पोरांच्या कुस्तीत रेवड्या व फुटाणे हेच असतं. अधून-मधून मारामारी होते. पण गावापुढे कोणाचे चालत नाही.

इकडे बाया-पोरींची देवीच्या दर्शनाला झुंबड उडते. पोरांच्या रडण्याचा आवाज येतो. खाऊ घेण्यासाठी लहान पोरांची रडारड. हे केव्हड्याला, गप्प बस. आई मला हे घे. फक्त गोंधळच उडतो. बांगड्यावाल्याची, खेळणीवाल्यांची बरीच विक्री होते. कुस्त्यांचा कार्यक्रम संपतो तेव्हा खाऊवाल्यांची धांदल उडते. खाऊवाल्यांचा थोडासुद्धा खाऊ रहात नाही.

तिसऱ्या प्रहरची वेळ होते. जत्रेवरची गर्दी हळूहळू मावळत्या सूर्याबरोबर मावळते व घरची वाट धरण्यापूर्वी देवीचा फुटाणे-रेवड्याचा प्रसाद घेऊन, यात्रेची चर्चा करत प्रत्येकजण घराच्या पायऱ्या चढतो.

***

# गावकुसाचा विचारी विकास

**प्रा. राम डिंबळे,** कल्याण, जि. पुणे

खेडे हा शब्द क्षेत्र-खेत-शेत या शब्दांपासून आलेला आहे. याचा अर्थ खेडे म्हणजे शेताभवतीची शेतकऱ्यांची वस्ती असा पूर्वीपासून आहे. ही वस्ती एखाद्या विस्कळीत पुंजक्यासारखी असायची. संस्कृतात यालाच 'ग्राम' म्हणत. 'ग्राम' शब्दाचा अर्थ ढीग. म्हणजे ही एखाद्या ढिगासारखी जमलेली वस्ती. कोणी तिची आखणी केलेली नाही की सोयीस्कर रचना केलेली नाही.

जुन्या काळापासून खेड्यांची ही अशी दुर्लक्षित स्थिती होती. त्यानंतर रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विनोबाजी यांनी खेड्यांच्या प्रगतीकडे सर्वांचे लक्ष वेधले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खेड्यांच्या विकासाच्या काही योजना राबविल्या गेल्या. पण खेड्याचा विकास करायचा म्हणजे नेमके काय करायचे याचा विचार केला गेला नाही. जुने, पिढ्यान्‌पिढ्यांचे खेडे बदलून टाकायचे. त्याची प्रगती करायची. तिथे भरभराट व समृध्दी आणायची. खेड्याचा उद्‌धार करायचा. ग्रामीण पुनरर्चना करायची यासारख्या वाक्यांनी विकासाची कल्पना लोक व्यक्त करीत असतात.

खेड्यात राहाणारी व शेती करणारी माणसे याबाबत काय विचार करतात याची मात्र फार थोड्यांना कल्पना आहे.

भोवतालच्या जगात काय घडते आहे याची आमच्या खेडुतांना माहिती मिळते का? ही माहिती न मिळाल्याने त्यांचे काही बिघडते का? माहिती किंवा बातमी मिळाली की 'घटकाभराची करमणूक' यापेक्षा जास्त उपयोग या गोष्टीचा त्यांना असतो का? बाहेरच्या दुनियेशी त्यांचे काही देणेघेणे असते का? चांगले ऐकले, पाहिजे की त्याचे अनुकरण आपोआप होते का? देश, प्रांत म्हणून काही आहे, त्यातल्या घडामोडी माझ्या गावावर व माझ्यावर परिणाम करतात असे त्याला कळते का?

या सगळ्याबाबतची वस्तुस्थिती मोठी गंभीर आहे. इतिहास काळातही राजेरजवाड्यांच्या लढाया चालत आणि रणक्षेत्रापलीकडच्या शेतातला शेतकरी तटस्थपणे त्याचे शेत नांगरीत असे. त्याचे आणि त्या लढाईचे काही देणेघेणे नव्हते.

बाहेरच्या जगात गेल्या शंभर वर्षात दोन महायुध्दे झाली. त्या युध्दांची गंधवार्ता खेडोपाडी फारशी पोचली नाही. माझ्या लहानपणी मी एक वाक्य नेहमी ऐकत असे-

'वार टायमात लय म्हागाई झाली.' पण वार टाइम म्हणजे दुसऱ्या महायुध्दाचा काळ, हे मला आता कळले. त्यावेळी कुणाचे, कुणाशी, का व कधी युध्द झाले याचा पत्ता नव्हता. हिटलरचे नाव माहीत असलेली माणसे माझ्या गावात जवळजवळ नव्हतीच. स्वांतत्र्याची एवढी चळवळ झाली. पण त्या चळवळीने माझे गाव ढिम्म हलले नाही! तरी गावच्या डोंगरावरचा सिंहगड किल्ला,टिळक महाराज आणि गांधी महाराज ही कोणीतरी संतमंडळी असावीत, एवढीच बातमी.

त्यामुळे जवळजवळ ६५ सालापर्यंत पुण्यापासून आवघ्या ३४ मैलावरचे माझे कल्याण गाव अनादिकालापासून जसे होते तसेच्यातसे शाबूत होते ! काही म्हणता काही बदल त्यात घडला नव्हता. गावाच्या पाणोठ्याची विहीर एवढे एकच सार्वजनिक बांधकाम होते. त्याचा आकार होता आठ फूट व्यास, बारा फूट खोली! ते थोड्याफार चुन्यात बांधलेले काम आणि तालमीचा सिंमेट घोटाई केलेला हौदा एवढाच वेगळ्या आकाराचा बांधकामाचा नमुना होता.

विज्ञानाने शेकडो शोध लावले. हर तऱ्हेच्या नवनवीन सुखसुविधा व्यवहारात अवतरल्या. पण आत दूरवर वसलेल्या खेड्यात ही जादू माहीतच नव्हती ! सायकल ही वस्तू कशी असते ते खास पाहण्यासाठी आम्ही ५५ साली हमरस्त्यापर्यंत (पायी) सहल काढली होती. ६५ साली एक रेडिओ नावाचे जादूचे यंत्र या गावात प्रथम आणले. तेव्हा आख्खे गाव रोज ते ऐकायला देवळात जमत असे. वीज, पंप, मोटारसायकल, टी.व्ही., आर.सी.सी. ची दुमजली घरे या सगळ्या गेल्या पंधरा वर्षात पाहायला मिळालेल्या गोष्टी !

खेड्याकडे सरकार विशेष अगत्याने पाहू लागले ८० ते ८५ च्या सुमारास. विकासाच्या नावाखाली थोड्या सुधारणा करून पुढाऱ्यांनी श्रेय मिळवायला सुरुवात केली. पण प्रश्न असा की विकास म्हणजे नेमके काय? हा विकास म्हणतात का? हा विकास कुणी आखला, कुणी पार पाडला? त्यासाठी कुणी व का पैसा ओतला? हा विकास एकदाचा उरकला का? इथून पुढे मग करायचे काय?

खेड्याच्या किंवा कुणाच्याही विकासाची कल्पना शिस्तशीर रितीने पारखली तर असे दिसते की कसला का होईना, कुणामुळे का होईना बदल हवा. झालेल्या प्रत्येक बदलाला केवळ गफलतीने लोक विकास म्हणतात.


खऱ्या विकासाचे उदाहरण गोबरगॅसचे आहे. चूल पेटवण्यासाठी शेण-गोवऱ्या जाळणे म्हणजे उद्याच्या पिकाची उपासमार आहे. हे लोकांना कळतच नव्हते. त्यावर गोबरगॅसच्या उपाय निघाला. शेण शाबूत तरी चूल चालू असा चमत्कार विज्ञानाने शक्य झाला. सौर शेगडीची देखील अशीच गोष्ट. सांडपाण्याने गावभर घाण पसरवण्याऐवजी त्यावर घराभोवती झाडे लावण्याचा विचारही असाच. म्हणजे हे सारे बदल अधाशी नव्हते. ते बदल उद्याचा विचार करतात.

रासायनिक खतांचा वापर घातक असल्यामुळे आज सेंद्रिय खतांचा प्रचार केला जात आहे. मग जाहिरातीला बळी पडून केलेला रासायनिक खतांचा वापर ही प्रगती की अधोगती? मला असे वाटते की शेतकऱ्यांनी जाहिरात व प्रचाराला बळी पडून केलेला हा बदल म्हणजे  काही विकास नव्हे. मग तो प्रचार शासन, स्वयंसेवी संस्था किंवा शास्त्रज्ञांनी केलेला का असेना. प्रचारानंतर विचार व प्रयोग होणार तो हिताचा की अहिताचा.

आज घरोघरी टी. व्ही. पोचल्याने प्रचाराचा अतिरेक झाला आहे. खेड्यातला भांबावलेला माणूस या प्रचाराला अलगद बळी पडत आहे.

पहिली गोष्ट म्हणजे माती म्हणजे घाण आहे व ती हरप्रकारे (जाहिरातीतले साबणच वापरून) कपड्यावर राहू देता कामा नये. असा परिणाम सर्वांच्या मनावर या जहिराती करतात.

'शाम्पू, सौंदर्यसाबुन, क्रीम व पावडरी लावा आणि सिनेमा नट्यांसारख्या गोऱ्यागुलाबी दिसा' असा ज्या जाहिरातींचा प्रचार आहे त्या खेड्यातील मुलींना काय



शिकवतात? त्या सांगतात की 'निरोगी, दणकट असलन काय उपयोग आहे? उन्हात काळ्या पडाल तुम्ही. त्यापेक्षा सावलीत बसा आणि स्वत:ला सजवीत राहा.'

ही जर प्रगती असेल, तर शेतात काम का करायचे? ऊन, माती, घाम यांच्याशी का जमवून घ्यायचे?

एकूण सूत्र असे की विकास म्हणजे निव्वळ बदल नव्हे. विकास म्हणजे फेरमांडणी. ती सुध्दा कुणीतरी दुसऱ्याने केलेली नव्हे, तर स्वत: केलेली. नाइलाजाने केलेली नव्हे तर डोके शाबूत ठेऊन, उद्याचा विचार करून, आपण स्वत: नीट आखणी करून केलेली फेरमांडणी. संपूर्ण खेडे अशी फेरमांडणी करायला उगाचच निघणार नाही. त्यासाठी त्यातल्या कुणीतरी पुढाकार घ्यावा लागेल. हा पुढाकार घ्यायला त्याच्यापुढे एखादा नमुना कुणीतरी जिव्हाळ्याने मांडला पाहिजे. हा कोणीतरी एकतर शासन असू शकेल किंवा ज्ञान प्रबोधिनीसारखी संस्था असेल किंवा अण्णा हजारे यांच्यासारखा सद्‌भावी कार्यकर्ता असू शकेल. क्वचित् एखादा सरळ राजकारणी पुरुषदेखील हे विवेकी बदलाचे काम सुरू करू शकेल.

पण फेरमांडणीची भूक खुद्द गावकऱ्यांना लागली पाहिजे. फेरमांडणी केली नाही तर उद्याचे दिवस अवघड आहेत याची जाणीव गावात निर्माण झाली पाहिजे.

ही फेरमांडणी जशी गावठाणाची, शिवाराची, नदी, डोंगर, माळ यांची करावी लागेल तशीच गावातल्या माणसांचीही करावी लागेल. ही फेरमांडणी म्हणजे एकाच्या जिवावर दुसऱ्याने जगण्याची जुनी पध्दत बदलून एकमेकांना पूरक अशी देवाणघेवाणीची व्यवस्था करणे. पूर्वी हरिजन मंडळी म्हणजे गावचे हक्काचे शेतमजूर असत. आता त्यांना परवडेल तरच शेतमजुरी करायची असे धोरण स्वीकारले कारण त्यांना कारागिरी, सरकारी नोकऱ्या यात पर्याय मिळू लागले. इथे शोषणाऐवजी देवाण-घेवाण असे सोयीचे नाते निर्माण झाले. असेच नाते गावचे डोंगर, नदी, माल, शेती या नैसर्गिक संपत्तीशी निर्माण व्हायला हवे.

गावची माणसे आणि शिवार यांची क्षमता वाढवतो हा विकासाचा महत्त्वाचा मूलमंत्र आहे. माणसे शिकावीत, सबळ, शहाणी, अधिक कार्यक्षम व्हावीत, परस्परांशी जमवून घेत, एकीना सफल होणारी व्हावीत याला विकास म्हणायचे. गाव सोडून परागंदा होण्यात कसला विकास आहे? गावात सक्षम होण्याची, सफल होण्याची शक्यता नाही म्हणून कुवत असलेली माणसे गाव सोडून शहारातील झोपडपट्टीत जात आहेत. विकास म्हणजे या माणसांच्या सफलतेची शिवारातच सोय करणे.

जगाने आजवर खेड्याला वापरून घेतले. आता खेड्याने जगाला वापरून स्वत:ला सावरायला हवे. याला म्हणावे स्वावलंबी, टिकाऊ आणि विवेकी विकास.

***

## मे १९९६ च्या सुट्टीत इ. ८वी ते १०वी च्या
## विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी !
## ज्ञान प्रबोधिनीद्वारा आयोजित प्रशिक्षण वर्ग

### स्वयं अध्ययन कौशल्ये

अभ्यास कसा करावा हे जाणून घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्गाचे आयोजन! आधुनिक तंत्रे, प्रात्यक्षिके व सराव पाठ यांच्या साहाय्याने या वर्गात येऊन शिका......

- वाचनवेग कसा वाढवावा !
- स्मरणशक्ती कशी वाढवावी !
- आपले आकलन कसे सुधारावे !
- टिपणे कशी काढावीत !
- गतीलेखन कसे करावे !
- आपल्या अभ्यासाचे नियोजन कसे करावे !
- परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी !

### प्रतिभा विकसन

अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशातील शिक्षणामध्ये शिकविली जाणारी प्रतिभा विकसनाची आधुनिक तंत्रे आपल्याही विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत म्हणून या वर्गांचे आयोजन ! या वर्गात येऊन

- आपली जिज्ञासा, निरीक्षण शक्ती वाढवा.
- आपल्या कल्पनाशक्तीला पंख फुटू द्या.
- कविता, कथा, निबंध या द्वारा सृजनाचा आनंद लुटा !
- विज्ञानातील मुक्त प्रयोगांद्वारा प्रतिभेचा आविष्कार करा !

### विज्ञान प्रकल्प शिबिर

विज्ञानयुगात वावरायचे तर वैज्ञानिक दृष्टिकोन हवाच ! असा दृष्टिकोन स्वत: प्रयोग करून तयार व्हावा व त्याचबरोबर प्रयोगशाळेतील अनुभव, संशोधनाचा आनंद, वैज्ञानिक तत्त्वांचे अचूक आकलन अन् कौशल्यांचे प्रशिक्षण यासाठी प्रकल्प शिबिरात सहभागी व्हा.

- अचूक व चौकस निरीक्षणाद्वारा स्वत: प्रयोग करून निष्कर्ष काढणे.
- विविध शास्त्रीय तत्त्वे तपासून पाहणे.
- संदर्भ ग्रंथांचा वापर करून माहितीचे संकलन करण्याचे कौशल्ये मिळविणे.
- प्रयोगशाळेतील निरनिराळी उपकरणे वापरण्याची संधी घेणे.

स्वत:ची गुणवत्ता वाढविण्याची अमूल्य संधी दवडू नका.

वरील तीनही वर्ग स्वतंत्रपणे पण एकाच वेळेस चालू असतील. सर्व वर्ग दररोज दुपारी तीन तास याप्रमाणे सहा-सहा दिवसांचे असतील.

वर्गांचा प्रारंभ: ६मे, १३ मे, २०मे, २७मे, ३जून १९९६

शुल्क: प्रत्येक वर्गासाठी रु, १००/-

स्थळ: ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, ५१० सदाशिव पेठ, पुणे-३०

नावनोंदणी: छात्र प्रबोधन कार्यालय, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

## शिबिरांच्या तारखांमधील बदल

निवडणुकांच्या जाहीर झालेल्या तारखा लक्षात घेऊन मुलींच्या व्यक्तिमत्व विकसन शिबिरांच्या तारखांमध्ये खालील प्रमाणे बदल केला आहे. बाकीची सर्व शिबिरे यापूर्वी जाहीर केलेल्या वेळीच होतील.

### मुलींची व्यक्तिमत्व विकसन शिबिरे

१ ते ७ मे ९६ : पुणे, ठाणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक. ३ ते १० मे ९६ : लातूर, सांगली, धुळे.

### सुट्टीतील मेळावे

व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे होणाऱ्या सर्व ठिकाणी १० ते २० एप्रिल या काळात सभासदांचे मेळावे होणार असून जास्तीत जास्त सभासदांनी आपल्या मित्रमैत्रिणींना घेऊन या मेळाव्यास उपस्थित राहावे. मेळाव्यांचे तपशिलासाठी (दिनांक–वेळ–ठिकाणी) खालील स्थानिक कार्यालयांमध्ये चौकशी करावी.

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

निगडी : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४ ☎ ८४३८०
सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर ☎ २५७८२
सातारा : श्री सतीश कुलकर्णी, प्लॅट नं.५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फे, सातारा. ☎ ५०५०४
सांगली : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खडिलकर गल्ली, सांगली. ☎ ७७३८२
कोल्हापूर : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ २१५३४
नाशिक : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म.गांधी रोड, नाशिक ☎ ५७४८३०
ठाणे : डॉ. अजित दातार, बी–२० अहिल्या सोसा., घंटाळी रोड, नाशिक ☎ ५४२१०८७
डोंबिवली : सौ. ज्योती औटी, ३–श्री बिल्डींग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पूर्व) ☎ ४७४१३९
पनवेल : सौमेधा मयुरेश सोहोनी, पी. एल–६–१३–६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, नवीन पनवेल.
रत्नगिरी : कु. नीता अ. श्रीखंडे, २९१३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. ☎ २२४८७
धुळे : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे.
चाळीसगाव : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव
परभणी : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.
लातूर : डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४
औरंगाबाद : १) कर्नल पी. एन. मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७, सेक्टर नं. 'C' N-1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. ☎ ४८२६२६
२) सौ. स्वाती शरद पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद ३.
बेळगाव : अमित कुलकर्णी, ३७५ नेहरु रस्ता, ठिळकवाडी, सोमवार पेठ, बेळगाव.

या कार्यालयामध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधन द्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

या व्यतिरिक्त मुंबई, अहमदनगर, जालना, जळगाव, रायगडल सिंधुदुर्ग, बीड, उस्मानाबाद या ठिकाणी छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी मुख्य कायालयाशी संपर्क साधावा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून सौर चैत्र १ शके १९१८, २१ मार्च १९९६ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिध्द केले आहे.

॥ सर्व दिशांनी विकसित व्हावे व्यक्तिमत्त्व येथे ॥

छात्र प्रबोधन .... निव्वळ मासिक नव्हे ! .... कृतिशील उपक्रमांचा स्रोत !

## ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रात १८ ठिकाणी शिबिरे !

### व्यक्तिमत्त्व विकास शिबिर

**खेळ, व्यायाम**
- देशी विदेशी खेळ
- नावीन्यपूर्ण बरची नृत्य
- योगासने

**विज्ञान प्रयोग**
- शास्त्रीय उपकरणे करणे
- प्रयोग, प्रकल्प करणे
- शोध तपासून पाहाणे

**हस्तकौशल्ये, छंद वर्ग**
- बांधणी, रांगोळी
- कागदी फुले, भेटवस्तू
- नाट्य, वक्तृत्व, स्फूर्तिगीते

**विविध स्पर्धा**
- गंमत जत्रा
- बुद्धिबळ, सामान्यज्ञान
- क्रीडा स्पर्धा

**सहल-भेटी-मुलाखती**
- एक दिवसाची सहल
- महत्त्वाच्या स्थळांना भेटी
- विशेष व्यक्तींच्या मुलाखती

**कथाकथने-चर्चा**
- प्रेरक, मनोरंजक कथा
- सद्य घडामोडींवर चर्चा
- व्यक्तिमत्त्व विकसन व्याख्याने

### मुलांसाठी शिबिरे

**कालावधी :** २३ ते २९ एप्रिल ९६
**ठिकाणे :** परभणी, रत्नागिरी
**कालावधी :** १ ते ७ जून ९६
**ठिकाणे :** सांगली, सातारा, कोल्हापूर, धुळे, नाशिक, ठाणे, लातूर, औरंगाबाद

### मुलींसाठी शिबिरे

**कालावधी :** ३ मे ते १० मे ९६
**ठिकाणे :** सांगली, सातारा, कोल्हापूर, धुळे, नाशिक, ठाणे, लातूर, पुणे.

**शिबिराचे शुल्क : रु. ५०/- (सभासदांसाठी रु. ४०/-)**

शिबिरस्थान,नावनोंदणी व अन्य तपशिलांसाठी छात्र प्रबोधनच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधावा.

**शिबिराचे शुल्क भरून लवकरात लवकर आपले नाव निश्चित करा.**
**आपल्या मित्रमैत्रिणींनाही शिबिरात सामील करून घ्या !**
**व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या शिबिरांमध्ये सहभागी व्हा !**

नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे, १० वी **N.T.S.** मार्गदर्शन शिबिर व संयोजक प्रशिक्षण शिबिर (पालक-शिक्षकांसाठी) या शिबिरांची माहिती आतील पानावर दिली आहे.

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW / 349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# या माझ्या भारतदेशी

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावी
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ॥धृ.॥

शेतात कोरड्या किसान गाळी घाम
पेरले उगवता हरखुन जाई भान
भरगच्च पिकाने पिवळे होई रान
बळिराजाची परि बाजारी धुळदाण
या भारतभूपुत्राच्या कष्टाला किंमत यावी

गावात भांडती भाउबंद शेजारी
हे लोक निरक्षर कर्जाने आजारी
भाबडे भोळसट व्यसनांनी बेभान
मागास रिकामे शहरांचेच गुलाम
या गावकऱ्यांच्या गावी नवनवी उभारी यावी

ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला
रखरखीत झाली ओलावा ओसरला
बोडके नागडे होता डोंगरमाथे
आटले झरे अन् सुकलेले पाणोठे
या सुकलेल्या रानात रुजवू या जीवनराई

कान्ह्याच्या गावी भरले गोकुळ होते
गोपांच्या मेळी गोवर्धनबळ होते
कालिया पूतना कंस संपले सारे
यमुनेच्या काठी स्वातंत्र्याचे वारे
हरिकथा अवतरो हीच माझिया गावी

संपर्क पत्ता :
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१
कार्यालयाची वेळ : स. १० ते संध्या. ७
या अंकाची किंमत : रुपये ८/-
वार्षिक वर्गणी : रुपये १००/-
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १ चैत्र, शके १९१८
२१ मार्च, १९९६